नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १७८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरूवार, दि. ०४ जून २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### दोन लाखांची कर्जमाफी मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या घटणार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेतील निकषानुसार दोन लाखांची कर्जममाफी मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कमी व ५० हजार रुपये प्रोत्साहन पर अनुदान मिळणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक असण्याची शक्यता सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांकडून वर्तवली जात आहे. यापूर्वीच्या सन २०१९ मध्ये महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे थकबाकीदार शेतकरी मोठ्या संख्येने दोन लाखांच्या कर्जमाफीसाठी अपात्र ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेचे निकष राज्य सरकारने आदेशाद्वारे जाहीर केले. त्यानुसार १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ पर्यंत पीककर्ज थकीत असणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्याचे जाहीर करण्यात आले. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचा लाभ मिळणार आहे.

### बंडखोरांनी उमेदवारी मागे घ्यावी : चव्हाण

मुंबई (स. गांवकरी) : आगामी विधान परिषद निवडणुक महायुती एकत्रितपणेच लढणार असून बंडखोर उमेदवारांनी वरिष्ठ नेत्यांशी बोलून उमेदवारी मागे घ्यावी, असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे गट) नेते राहुल शेवाळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) नेते सुनील तटकरे यांच्यासमवेत घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले. संभ्रम टाळण्याकरिता महायुतीकडून यावेळी १७ अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. या उमेदवारांव्यतिरिक्त कुणालाही महायुतीचा पाठिंबा नसेल. त्यामुळे बंडखोरांनी आपल्या वरिष्ठ नेत्यांशी बोलून तोडगा काढावा, असा निर्वाणीचा इशारा चव्हाण यांनी दिला. नाराज असलेल्यांविषयी सकारात्मक विचार बाळगून त्यांना भविष्यात महामंडळांवर किंवा समित्यांवर सामावून घेतले जाईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# आधीच्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना फटका

## महात्मा फुले योजनेतील शेतकऱ्यांवर अन्याय

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महायुती सरकारने जाहीर केलेल्या सुमारे ३६ हजार कोटींच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेमुळे ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा होणार असल्याचा दावा राज्य सरकार आहे. परंतु प्रत्यक्षात दोन लाखाच्या आत थकीत कर्ज असलेल्या १६ लाख ४८ हजार शेतकऱ्यांनाच या योजनेचा खऱ्या अर्थाने लाभ होणार आहे. उलट महाविकास आघाडी सरकारने राबविलेल्या महात्मा फुले कर्जमाफी योजनेतीलल तब्बल १२ लाख ७१ हजार लाभार्थ्यांना केवळ ५० हजार रुपयांचीच मदत करण्याचा सरकारचा निर्णय वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सरकारने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेत कर्जमुक्ती, एकवेळचा समझोता आणि प्रोत्साहनपर लाभ असे तीन घटक करण्यात आल्याने, राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल असा दावा सरकारकडून करण्यात येत आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतचा शासन निर्णयही तातडीने




निर्गमित करण्यात आला असून त्यात योजनेचा तपशील स्पष्ट करण्यात आला आहे. या योजनेनुसार दोन लाखांपेक्षा ( मुद्दल व व्याज) कमी कर्ज असलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ होणार आहे. याचाच अर्थ दोन लाखापेक्षा कमी कर्ज असलेले १६ लाख ४८ हजार शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार आहेत. त्यामुळे सरकारवर तातडीचा १४ हजार ७५४ कोटींचा आर्थिक भार पडणार आहे.

सन २०१९मध्ये काँग्रेस- राष्ट्रवादी- शिवेसना महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांसाठी महात्मा जोतिराव फुले कर्जमाफी योजना जाहीर केली होती. या योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना आता केवळ ५० हजार रुपयांचीच मदत देण्याचा राज्य सरकाचा निर्णय वादात सापडला आहे.

महात्मा फुले योजनाचा लाभ घेतलेल्या १२ लाख ७१ हजार शेतकऱ्यांचे पुन्हा कितीही कर्ज थकले असले तरी त्यांनी ५० हजार रुपयांच्या वरची सर्व रक्कम भरल्यानंतरच त्यांना ५० हजार रुपयांचा लाभ देण्याच्या निर्णयामुळे शेतकरी वर्गात नाराजी पसरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात २०१४मध्ये शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती. त्या शेतकऱ्यांना सन २०१९च्या कर्जमाफीचा लाभही देण्यात आला. मग यावेळीच शेतकऱ्यांमध्ये भेदभाव का अशी विचारणा शेतकरी वर्गातून केली जात आहे.

अशाच प्रकारे दोन लाखांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना दोन लाखांवरील थकबाकी भरण्यासाटी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. जोवर हे शेतकरी ही रक्कम भरणार नाहीत तोवर त्यांना दोन लाखाचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे दोन लाखांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या २ लाख ९० हजार शेतकऱ्यांनाही या कर्जमाफीचा लगेच लाभ मिळणार नाही.

# राहुरी शहरात आईस्क्रीम दुकानावर कारवाई

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

- अन्न भेसळविरोधी मोहिमेत राहुरी व नेवासात कारवाई
- आईस्क्रीम व खाद्यतेलाचा २ लाख ८४ हजार किंमतीचा साठा जप्त

जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या अन्न भेसळविरोधी विशेष मोहिमेत राहुरी व नेवासा तालुक्यात कारवाई करून २ लाख ८४ हजार १८० रुपये किमतीचे संशयित आईस्क्रीम व खाद्यतेल जप्त करण्यात आले असून नागरिकांना अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत शंका असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी केले आहे.

राहुरी येथील शिवशक्ती आईस्क्रीम या आस्थापनाची तपासणी करून



शिवशक्ती ब्रँडच्या आईस्क्रीम गुलकंद व अमेरिकन नट्स या उत्पादनांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. दर्जाहीन असल्याच्या संशयावरून या ठिकाणी ४१ हजार ४४० रुपये किमतीचे एकूण १४८ पॅकेट्स आईस्क्रीम जप्त करण्यात आले. तसेच नेवासा तालुक्यातील कडू गल्ली येथील संतोष किराणा स्टोअर्सची तपासणी करून एसबीजी ब्रँडच्या रिफाइंड पामोलीन ऑईल या खाद्यतेलाचा नमुना तपासणीसाठी घेण्यात आला. हा साठा संशयास्पद आढळल्याने २ लाख ४२ हजार ७४० रुपये किमतीचे १ हजार ४९८.४ किलो खाद्यतेल जप्त करण्यात आले. अन्न व औषध विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार व सहआयुक्त श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ व नियम २०११ अंतर्गत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत अन्न सुरक्षा अधिकारी प्रदीप पवार, अन्न सुरक्षा अधिकारी उ. र. पाटील व सहायक आयुक्त अन्न अ. अ. भोईटे यांनी या कारवाया केल्या आहेत.

नागरिकांना स्वच्छ व भेसळमुक्त अन्न उपलब्ध व्हावे यासाठी जिल्हाभर ही मोहीम अधिक व्यापक स्वरूपात सुरू आहे. अन्न सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# गणपतराव देशमुख सूत गिरणीला सरकारी मदत!

## ६३ लाखांच्या व्याज परतव्याला राजकीय रंग


मुंबई : (स. गांवकरी)

डॉ. भाई गणपतराव देशमुख शेतकरी सहकारी सूतगिरणीला व्याज परतवा योजनेअंतर्गत ६३ लाख ३५ हजार ३३१ रुपयांचा व्याज परतवा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विधान परिषदेच्या सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील भाजपचे उमेदवार राजेंद्र राऊत यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना दिवंगत गणपतराव देशमुख यांचे नातू आणि शेकापचे सांगोल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख उपस्थित होते. त्या पार्श्वभूमीवर या व्याज परतव्याला राजकीय रंग प्राप्त झाला आहे. राज्यातील सहकारी सूतगिरण्या सुरळीत चालाव्यात, आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात, या करिता राज्य सरकारने सूतगिरण्याच्या मध्यम मुदतीच्या कर्जावर १२ टक्के व्याज परतव्याची योजना सुरू केली होती. सांगोल्यातील गणपतराव देशमुख सूतगिरणीने सोलापूर जिल्हा बँकेकडून २१ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. प्रती चाती पाच हजार रुपये प्रमाणे १२ टक्के व्याज दराच्या मर्यादित ६३ लाख ३५ हजार ३३१ रुपयांचा व्याज परतवा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या बाबतचा शासन आदेश बुधवारी प्रसिद्ध झाला आहे. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख महाआघाडीचा घटक पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षाचे आमदार आहेत.




# रेल्वे फलाटावर तुकाराम मुंडेंना 'नो एन्ट्री'!

## '५ मीटर'च्या त्या रेषेमुळे रेल्वे कॅन्टीनवाल्यांचे फावले?



### '५ मीटर'ची ती रंजक सीमारेषा!

परवाना वाटपाच्या नियमांमध्ये एक अत्यंत रंजक कायदेशीर सीमारेषा आहे. जर एखादा खाद्यपदार्थांचा स्टॉल किंवा समोसा, कचोरी, वडापावची गाडी रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वाराच्या बाहेर, अगदी ५ मीटर अंतरावर महापालिकेच्या रस्त्यावर असेल, तर त्यावर कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार राज्य एफडीए पथकाला असतो. मात्र, तोच विक्रेता स्थानकाच्या आत प्रवेशद्वाराच्या पलीकडे (रेल्वेच्या हद्दीत) असेल तर त्याच्यावर राज्य सरकारचे अधिकारी कारवाई करू शकत नाही; तिथे केवळ रेल्वे प्रशासनच कारवाई करू शकते.

नागपूर : (स. गांवकरी)

रेल्वे स्थानके आणि चालत्या गाड्यांमधील खाद्यपदार्थांच्या सुमार दर्जाबाबत प्रवाशांच्या नेहमीच तक्रारी असतात. मात्र, रेल्वेच्या हद्दीत अन्न सुरक्षा कायद्याच्या कडक आणि किचकट नियमांमुळे महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे या खाद्य पदार्थाच्या दुकानांवर कारवाई करू शकत नाहीत. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ च्या अंतर्गत भारतीय रेल्वेला अन्न सुरक्षा अंमलबजावणीसाठी एक संपूर्णपणे स्वतंत्र आणि स्वायत्त भौगोलिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्य 'एफडीए'च्या अधिकाऱ्यांचे कार्यक्षेत्र केवळ महाराष्ट्राच्या भौगोलिक सीमांपुरतेच मर्यादित असते. केंद्र सरकारच्या अखत्यारीत येणाऱ्या रेल्वे मालमत्तांवर राज्याचे कायदे लागू होत नाहीत. त्यामुळेच राज्य एफडीएकडून रेल्वे हद्दीत होणारी कोणतीही कारवाई कायदेशीरदृष्ट्या 'अवैध' ठरू शकते. अन्न सुरक्षा कायद्याच्या कलम ३७ नुसार, रेल्वे नेटवर्कमधील विक्रेत्यांची तपासणी करणे, अन्नपदार्थांचे नमुने घेणे आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याचे संपूर्ण अधिकार रेल्वेच्या मुख्य वैद्यकीय संचालकांना आणि आरोग्य निरीक्षकांना दिले आहेत. हे अधिकारीच रेल्वेचे अधिकृत 'अन्न सुरक्षा रक्षक' म्हणून काम करतात. तसेच, रेल्वे प्रवाशांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवर रेल्वे कायदा, १९८९ च्या कलम १४४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याचे अधिकारही केवळ रेल्वे पोलिसांना आणि याच रेल्वे यंत्रणेला आहेत. रेल्वेच्या हद्दीत अन्न सुरक्षेची काळजी घेण्यासाठी 'भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण' द्वारे केवळ रेल्वेसाठी विशेष 'नियुक्त अधिकारी' आणि 'अन्न सुरक्षा अधिकारी' नियुक्त केले जातात. मध्य, पश्चिम किंवा दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे परिमंडळातील विशिष्ट वैद्यकीय आणि आरोग्य अधिकार्यांनाच केंद्रीय परवाना प्राधिकरणाचे अधिकार बहाल करण्यात आले आहेत.



# थोडक्यात पण महत्वाचे



## भूमिपुत्रांचा गौरव; सेवानिवृत्त जवान, शिक्षक व अधिकाऱ्यांचा सन्मान

श्रीगोंदा (स. गांवकरी) : लोणी व्यंकनाथ ग्रामपंचायत व अग्नीपंख फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त जवान, सेवानिवृत्त शिक्षक, अधिकारी तसेच भारतीय सैन्य दलात नव्याने भरती झालेल्या जवानांचा सन्मान सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसभापती गणपतराव काकडे होते. यावेळी भारतीय सैन्य दलातील सेवानिवृत्त जवान नितीन काकडे, शिक्षक डी. आर. काकडे, रामदास साळवे, राजाराम गायकवाड, रामदास फटाकडे, अधिकारी शिवाजी जाधव तसेच भारतीय सैन्य दलात भरती झालेला जवान अर्जुन धोत्रे यांचा उत्कृष्ट कामगिरी व यशाबद्दल गौरव करण्यात आला. सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन हा सन्मान सरपंच मनीषा नाहाटा, उपसरपंच चित्राताई धाकड, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव बापू मगर, सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब थोरात, माजी अध्यक्ष लालासाहेब काकडे आणि गोरख ओव्हळ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य बाजार समितीचे सभापती बाळासाहेब नाहाटा यांनी केले. यावेळी गणपतराव काकडे, मधुकर पवार, दिलीप काकडे, डी. आर. काकडे, शिवाजी जाधव आणि राजाराम गायकवाड यांनी मनोगते व्यक्त केली. या प्रसंगी राजेंद्र कुंदांडे, एम. डी. खंडागळे, बंडू खंडागळे, भास्कर कुंदांडे, लियाकत तांबोळी, सदाशिव खंडागळे, हनुमंत मगर, राहुल गोरखे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.



## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने बी. टी. मखरे यांचा सत्कार

श्रीगोंदा (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, अहिल्यानगर जिल्ह्याचे सचिव पिटर रणसिंग यांच्या वतीने श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनचे प्राचार्य बी. टी. मखरे यांचा सेवा पूर्ती निमित्त सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. प्राचार्य मखरे यांनी शैक्षणिक क्षेत्रात तब्बल ३० वर्षे प्रदीर्घ सेवा बजावत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या निवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी संस्थेच्या नव्या प्राचार्या नयना वाळके, मेहेत्रे मॅडम, देवराम दरेकर, कल्पना वागस्कर, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे श्रीगोंदा तालुक्याचे माजी सचिव राम सोनवणे, प्रा. अतुल सूर्यवंशी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी प्राचार्य मखरे यांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## एडीबीचा निधी रखडला; तळेगाव-दिघे मार्गे संगमनेर रस्ता पुन्हा वाऱ्यावर!

कोपरगाव (स. गांवकरी) : तळेगाव-दिघे मार्गे संगमनेर या अत्यंत महत्त्वाच्या राज्य मार्गाच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी आशियाई विकास बँकेकडून (एडीबी) अद्याप निधी प्राप्त झालेला नसल्याची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यापूर्वीही या रस्त्याची दुरुस्ती होण्याची शक्यता धूसर बनली असून ग्रामस्थ, विद्यार्थी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उत्तर भारताला पुणे तसेच दक्षिण भारताशी जोडणाऱ्या या ३४.२ किलोमीटरच्या मार्गाची अवस्था गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यावरील खड्डयांमुळे अनेक अपघात घडले असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. वारंवार आंदोलने, रास्ता रोको आणि निवेदने देऊनही प्रश्न कायम असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. सन २०१८ मध्ये या मार्गासाठी सुमारे १८९ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र त्यानंतरही कामाला गती मिळाली नाही. आता पुन्हा आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत तळेगाव ते जिल्हा हद्द या ४४ किलोमीटरच्या मार्गासाठी ५२८ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव आहे. मात्र अद्याप निधी प्राप्त झालेला नसल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाने माहिती अधिकारात दिली आहे.

## अमित गोरखे यांची आमदारकी रद्द करावे : आंबेडकरी जनतेची मागणी




सोलापूर (स. गांवकरी) : भाजपचे आमदार अमित गोरखे हे एका विशिष्ट समाजाची बाजू घेऊन दुसऱ्या समाजावर टीका टिप्पणी करत आहेत दुसऱ्या समाजाला दोष देत या समाजाबद्दल आकस बाळगून आणि खुनस बाळगून जातीयवादी भाषेचा वापर करून विशिष्ठ एका समाजाला नाव ठेवत आहेत. हे सर्व संविधानातील तरतुदी आणि संविधाना मधून घेतलेल्या शपथेचा भंग करणारे वर्तन आहे. त्यामुळे अमित गोरखे यांची आमदारकी तातडीने रद्द करण्यात यावी. अन्यथा देशभर या विषयावर उग्र आंदोलन पेटवू असा गर्भित इशारा सोलापूर मधील आंबेडकरी समाजाने दिला आहे. "मी कोणाबद्दलही आकस किंवा ममत्व बाळगणार नाही..."अशी शपथ आमदार अमित गोरखे यांनी घेतली आहे. आमदार म्हणून शपथ घेताना. वरील शपथ मधील हे शब्द प्रत्येक लोकप्रतिनिधी मोठ्या अभिमानाने उच्चारतो. पण प्रत्यक्षात काय सुरू आहे? असा सवाल आंबेडकरी चळवळीतील नेतेमंडळी आणि आंबेडकरी समाज उपस्थित करत आहे. भाजप आमदार अमित गोरखे हे एका विशिष्ट जातीबद्दल उघडपणे ममत्व आणि इतर जातींबद्दल जाहीरपणे आकस बाळगताना दिसत आहेत. संविधानाने दिलेल्या शपथेचा हा सरळ-सरळ अवमान नाही का? असा सवाल सोलापुरातील आंबेडकरी जनता करत आहे. या जाहीरपणे पक्षपाती वर्तन करणाऱ्या आमदारावर कारवाई करण्याची हिंमत ' फडणवीस सरकारने दाखवावी , व नेहमीप्रमाणे इथेही सोयीस्कर मौन बाळगले जाणार नाही याची दक्षता घेतली जावी ? किंवा लोकप्रतिनिधी हा संपूर्ण जनतेचा असतो, केवळ एका घटकाचा नाही. जर पदाची आणि शपथेची प्रतिष्ठा राखता येत नसेल, तर कारवाई झालीच पाहिजे! असेही मागणी आंबेडकरी समाजाकडून केली जात आहे.

# संत निरंकारी मिशनचे हरित भविष्याकडे एक प्रेरणादायी पाऊल

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)




निसर्ग केवळ मानवी जीवनाचा आधारच नाही तर ईश्वराने दिलेला एक अद्वितीय वारसा आहे,ज्याच्या शीतल छायेखाली संपूर्ण सृष्टीचे अस्तित्व सुरक्षित आहे. जेव्हा मानव ब्रह्मज्ञानाशी जोडला जातो आणि निसर्ग हे परमेश्वराचे एक सुंदर प्रकटीकरण आहे हे जाणतो, तेव्हा प्रत्येक कृती संवर्धन, समृद्धी आणि कृतज्ञतेचे रूप धारण करते.तथापि, आधुनिकतेच्या आंधळ्या शर्यतीत, नैसर्गिक संसाधनांच्या अमर्याद शोषणाने पर्यावरणाच्या संतुलनाला गंभीर आव्हान दिले आहे, ज्यामुळे प्रदूषण,प्लास्टिक संकट आणि हवामान बदल यांसारखी जागतिक संकटे मानवजातीसमोर उभी आहेत. अशा वेळी, 'जागतिक पर्यावरण दिन' केवळ एक दिवस म्हणून नव्हे,तर जागरूकता,जबाबदारी आणि सामूहिक संकल्पाचा एक दिव्य संदेश म्हणून उदयास येतो.

निरंकारी सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज यांच्या पवित्र प्रेरणेने आणि दिव्य आशीर्वादाने,संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा असलेल्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन तर्फे, या वर्षीच्या संयुक्त राष्ट्रांच्या 'बीट प्लास्टिक पोल्युशन' (प्लास्टिक प्रदूषणावर मात करा) या संकल्पनेनुसार, शुक्रवार,५ जून रोजी संपूर्ण भारतातील १८ डोंगराळ आणि पर्यटन स्थळांवर एक भव्य वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहीम आयोजित केली जात आहे. ही मोहीम केवळ पर्यावरण संवर्धनाचा प्रयत्न नसून, 'सेवा,ध्यान आणि सुसंवाद' यांद्वारे निसर्गाचे जतन करण्याचा एक आध्यात्मिक प्रयत्न आहे.ज्या वेळी संपूर्ण जग पर्यावरण संरक्षणासाठी जाणीवपूर्वक व सकारात्मक पावले उचलत आहे, त्याच वेळी संत निरंकारी मिशन आपल्या सेवा मूल्यांद्वारे समाजात, विशेषतःतरुण पिढीमध्ये,हा संदेश दृढ करत आहे की स्वच्छता केवळ बाह्य पर्यावरणापुरती मर्यादित न राहता, ती विचार, मूल्ये आणि जीवनशैलीपर्यंतही पोहोचली पाहिजे. या भव्य मोहिमेत, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक, सेवादल सदस्य, भक्त आणि स्थानिक रहिवासी 'प्रत्येक कणात ईश्वरदर्शन' या भावनेने निसर्ग संवर्धनाच्या या पवित्र यज्ञात एकत्र येऊन सहभागी होतील.

संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे सचिव, आदरणीय श्री जोगिंदर सुखीजा यांनी माहिती दिली की,२०१४ पासून, मिशन संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या संकल्पनेनुसार, जागतिक पर्यावरण दिन सेवा, जागरूकता व लोककल्याणाचा दिवस म्हणून साजरा करत आहे यावर्षी,ही मोहीम १८ प्रमुख ठिकाणी आयोजित केली जाईल,ज्यात उत्तराखंडमधील मसुरी,ऋषिकेश,लॅन्सडाउन, नैनिताल आणि टिहरी तलाव; हिमाचल प्रदेशातील शिमला, मनाली व धर्मशाळा; गुजरात मधील सापुतारा; राजस्थान मधील उदयपूर; महाराष्ट्रातील महाबळेश्वर,पाचगणी,खंडाळा सह लोणावळा*, पन्हाळा आणि सोमेश्वर;सिक्कीममधील गंगटोक यांचा समावेश आहे. आणि कर्नाटकातील नंदी टेकड्या.ही सर्व ठिकाणे "हरित जाणीव, स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्त भारत" यासाठी प्रेरणास्रोत म्हणून काम करतील.

हा कार्यक्रम सकाळी ९:०० ते दुपारी २:०० या वेळेत होईल आणि त्याची सुरुवात भगवान निरंकारांच्या सामूहिक प्रार्थनेने होईल. सर्व स्वयंसेवक वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम, पथनाट्ये आणि जनजागृती उपक्रमांद्वारे शिस्त, समर्पण आणि एकतेचा दैवी संदेश पसरवून पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी समाजाला प्रेरित करतील. पर्यावरणाचे संदेश लिहिलेल्या फलक आणि मानवी साखळ्यांद्वारे "निसर्गाची सेवा करणे हीच ईश्वरसेवा आहे" हा संदेश दिला जाईल.संत निरंकारी मिशनने नेहमीच हे सत्य जपले आहे की, अध्यात्म ही केवळ एक कल्पना नसावी, तर मानवतेचे कल्याण साधण्याचे एक साधन असावे. "अमृत प्रकल्प," वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आणि रक्तदान यांसारखे असंख्य लोककल्याणकारी उपक्रम हे मिशनच्या व्यापक दृष्टिकोनाची प्रभावी उदाहरणे आहेत. निःसंशयपणे, संत निरंकारी मिशनची ही प्रेरणादायी मोहीम केवळ पर्यावरण संरक्षणापुरती मर्यादित नाही, तर प्रेम, सेवा, नम्रता आणि जागृतीने परिपूर्ण अशा उज्ज्वल भविष्याचा पाया आहे, जिथे भावी पिढ्या स्वच्छ, सुरक्षित, संतुलित आणि हरित पृथ्वीच्या आशीर्वादांचा आनंद घेऊ शकतील.

# 'हिरवा वसा' कवितेचा बालभारती पाठ्यपुस्तकात समावेश

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार यावर्षी तिसरीच्या नवीन अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यां साठी तयार करण्यात आलेल्या बालभारतीच्या पाठ्यपुस्तकात पुणे जिल्ह्यातील शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याच्या मढ गावचे सुपुत्र,प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांच्या "हिरवा वसा" या कवितेचा समावेश करण्यात आला असून हा अभ्यासक्रम येत्या जून पासून सुरू होत आहे. नवीन वर्षात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार यावर्षी तिसरीच्या पाठ्यपुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्ती वर आधारित कौशल्याधिष्टीत शिक्षणावर यात अधिक भर देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाचा राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक शिक्षक उत्तम सदाकाळ यांच्या विविधसाहित्य निर्मितीची महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने दखल घेत त्यांच्या हिरवा वसा कवितेचा समावेश तिसरीच्या बालभारती पाठ्यपुस्तकात केला आहे. येत्या जून पासून हा अभ्यास क्रम लागू करण्यात येणार असून शिक्षण आणि साहित्य क्षेत्रातून उत्तम सदाकाळ यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

# अतिक्रमण फक्त एक दिवसाकरिताच होते का?

- सर्वसामान्य नागरिकांचा सवाल
- अतिक्रमण काढल्याचा देखावा

जामखेड : (स. गांवकरी)



जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम काही दिवसांपूर्वी प्रशासनाकडून मोठ्या दिमाखात राबविण्यात आली होती. मात्र कारवाईनंतर अवघ्या काही दिवसांतच बीड रोड कॉर्नर ते खर्डा चौक या मुख्य मार्गावरील अतिक्रमणे पुन्हा पूर्ववत झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे अतिक्रमण हटविण्याची मोहीम फक्त एक दिवसापुरतीच होती का, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.कारवाईनंतर रस्ता मोकळा झाल्याने वाहतुकीला काहीसा दिलासा मिळाला होता. मात्र पुन्हा हातगाड्या, व्यावसायिक साहित्य आणि इतर अडथळे रस्त्यालगत उभे राहत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शनिवारच्या बाजाराच्या दिवशी वाहनांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने नागरिकांना ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. अतिक्रमण हटविण्याची कारवाई केल्यानंतर त्यावर सातत्याने देखरेख ठेवणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. काही दिवसांपूर्वी हटविण्यात आलेली अतिक्रमणे पुन्हा उभी राहत असल्याने प्रशासनाच्या कारवाईच्या परिणामकारकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.संबंधित विभागाने नियमित तपासणी करून अतिक्रमणांवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. तसेच अतिक्रमणमुक्त शहरासाठी प्रशासनाने कठोर भूमिका घेत पुन्हा सुरू झालेल्या अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# सोनालिकाची मे महिन्याच्या विक्रीत दमदार झेप

## १७,२०४ ट्रॅक्टरची विक्रमी विक्री

पुणे : (स. गांवकरी)



भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिका ट्रॅक्टर्सने मे महिन्यातील आतापर्यंतची सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टरची विक्री नोंदवत आर्थिक वर्ष २०२७ मध्ये आपल्या गतीला वेग दिला आहे. तसेच एकूण २१ टक्के वाढ नोंदवून उद्योगाच्या कामगिरीलाही मागे टाकले आहे. सोनालिकाचा हा नवा मैलाचा दगड शेतकऱ्यांपर्यंत 'जीतने का दम' पोहोचवण्यावर ब्रँडने सातत्याने दिलेला भर आणि भारताला कृषी महासत्ता बनवण्याच्या उद्देशाने शेतीच्या दृष्टीने कार्यक्षम आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्यात त्याची भूमिका अधोरेखित करणारा आहे. याशिवाय कंपनीने भारतातील आगामी खरीप हंगामाच्या तयारीचा एक भाग म्हणून आजपर्यंतच्या सर्वाधिक मासिक १७,०२९ ट्रॅक्टर उत्पादनाची नोंद केली आहे. मान्सून हा अनेक दशकांपासून भारतीय शेतीमध्ये आशावादाला चालना देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मात्र, शेतकरी आता सुधारित पीक व्यवस्थापन आणि चांगल्या उत्पादनासाठी सिंचनाच्या वाढत्या तीव्रतेवर अवलंबून राहत असून तांत्रिकदृष्ट्या प्रगत ट्रॅक्टर शोधत आहेत. भविष्यासाठी सज्ज असलेल्या उत्पादनांच्या माध्यमातून 'जीतने का दम'वर असलेल्या बळकट विश्वासाच्या आधारे सोनालिका ट्रॅक्टर्स तज्ज्ञ अभियांत्रिकीसह डिझाइन केलेले शक्तिशाली ट्रॅक्टर आणि जगातील नंबर १ ट्रॅक्टर प्लांटमध्ये विकसित करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या इंजिनांसह शेतकऱ्यांना सेवा देण्यासाठी सज्ज आहे. ग्रामीण बाजारपेठांमध्ये कंपनीची वाढणारी उपस्थिती आणि अविरतपणे ग्राहकांच्या समाधानावर लक्ष केंद्रित केल्याने देशाच्या कृषी वाढीच्या प्रवासात विश्वासू भागीदार म्हणून तिचे स्थान आणखी मजबूत झाले आहे. इंटरनॅशनल ट्रॅक्टर्स लिमिटेडचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक श्री. रमण मित्तल म्हणाले, "उद्योगाच्या कामगिरीला मागे टाकत एकूण २१ टक्के वाढीच्या आधारे मे महिन्यातील आतापर्यंतच्या सर्वाधिक १७,२०४ ट्रॅक्टर विक्रीची नोंद करण्याचा आम्हाला आनंद होत आहे. भारतीय शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी उमेदीने तयारी आधीच सुरू केली असून अधिक आत्मविश्वासाने यांत्रिकीकरणाची निवड करीत आहेत, याचा हा एक धाडसी संकेत आहे. यासोबतच शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आम्ही आजपर्यंतच्या सर्वाधिक १७,०२९ ट्रॅक्टरच्या मासिक उत्पादनाची नोंद केली आहे. केवळ संख्येपेक्षाही भारतीय शेतीतील चिरस्थायी चैतन्य ही आम्हाला सर्वाधिक प्रेरणा देणारी गोष्ट आहे. इथे प्रत्येक हंगामाची सुरुवात या विश्वासाने होते, की उद्याचे पीक आजच्यापेक्षा चांगले असेल आणि विकास नेहमीच शक्य आहे. शाश्वत प्रगती ही सातत्य व लवचिकतेवर आधारित असते आणि शेतकऱ्यांच्या हाती अधिक अधिकार देण्यासाठी ती कटिबद्ध असते, यावर आमचा नेहमीच विश्वास राहिला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील अरणगाव दुमाला येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व भगवंता शिंदे यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाला ग्रामस्थ, महिला, युवक-युवती तसेच जय मल्हार ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मनोगतात अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या न्यायप्रिय, लोककल्याणकारी आणि दूरदृष्टीपूर्ण राज्यकारभाराचा उल्लेख केला. संकटकाळात धैर्याने निर्णय घेणे, अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी कार्य करणे, हा अहिल्यादेवींच्या जीवनाचा आदर्श असल्याचे वक्त्यांनी सांगितले. तसेच देशभरातील विविध देवस्थाने, नदीघाट, बारवा, विहिरी आणि धर्मशाळांच्या उभारणीद्वारे त्यांनी केलेले जनकल्याणकारी कार्य आजही समाजाला प्रेरणा देणारे असल्याचे नमूद करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन जय मल्हार ग्रुपच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रुपच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी आयोजनाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे इतिहासातील थोर व्यक्तिमत्त्वांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत होत असल्याची भावना व्यक्त केली.

# अहमद इनामदार यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात संपन्न

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)




श्रीगोंदा पंचायत समिती कार्यालयात अनेक वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावणारे कनिष्ठ सहाय्यक अहमद इनामदार यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव समारंभ रविवारी (दि. 31 मे) आढळगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा तथा श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या मातोश्री प्रतिभाताई पाचपुते यांच्या हस्ते अहमद इनामदार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पत्नी नूरजहाँ इनामदार यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना प्रतिभाताई पाचपुते म्हणाल्या की, अहमद इनामदार यांनी पंचायत समिती कार्यालयात कार्यरत असताना अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने कर्तव्य बजावले. ग्रामीण भागातून कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची आस्थेने चौकशी करून त्यांना आवश्यक सेवा देण्याचा त्यांनी नेहमीच प्रयत्न केला. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आनंदी, निरोगी व सुखसमृद्ध जीवनाच्या शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

सत्काराला उत्तर देताना अहमद इनामदार यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्यामुळेच आपण प्रामाणिकपणे सेवा देऊ शकलो, असे सांगितले. सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रिय राहणार असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जमीर इनामदार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या सेवापूर्ती सोहळ्यास परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा प्रतिभाताई पाचपुते, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ, ज्येष्ठ पत्रकार उत्तम राऊत, श्रीगोंदा नगरपरिषदेचे नगरसेवक प्रशांत गोरे, अमीनभाई शेख, माजी नगरसेवक शब्बीर बेपारी, पंचायत समितीचे माजी सभापती विलास भैलुमे, माजी पंचायत समिती सदस्य रामदास घोडके, तालुका खरेदी-विक्री संघाचे उपाध्यक्ष शरद जमदाडे, सरपंच शिवप्रसाद उबाळे, उपसरपंच अनुराधा ठवाळ, शहाजी वाकडे, माजी चेअरमन देवराव शिंदे, दादासाहेब गव्हाणे, रघुनाथ सूर्यवंशी, प्रा. अकबर पठाण, हमीद शेख, फारुख इनामदार, राजेंद्र उकांडे, भाई इनामदार, नवनाथ सूर्यवंशी तसेच पत्रकार बांधव, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जावेद इनामदार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार तैय्यब इनामदार यांनी मानले. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

# भाजपाचा बार्शी प्रयोग की अकलूजचे मोहिते पाटलांची प्रतीक्षा?

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोण मारणार बाजी

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात भाजपाची सध्याची वाटचाल अनेक प्रश्न निर्माण करणारी ठरत आहे. जिल्हा परिषदेत निर्विवाद वर्चस्व मिळवल्यानंतर भाजपाची राजकीय घोडदौड अधिक वेगाने सुरू राहील, अशी अपेक्षा होती. मात्र विधानपरिषद उमेदवार निवडीतील विलंब, त्यानंतर झालेली निवड आणि त्या निवडीमागील राजकीय संदेश यामुळे जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. बार्शीचे राजेंद्र राऊत यांना विधानपरिषदेची उमेदवारी देण्यात आली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत किंवा क्षमतेबाबत प्रश्न नसला तरी या निर्णयातून भाजपाने नेमका कोणता राजकीय संदेश दिला, हा खरा चर्चेचा विषय ठरत आहे. कारण गेल्या काही वर्षांत सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघांमध्ये भाजपाला अपेक्षित यश मिळालेले नाही. उलट दोन्ही ठिकाणी झालेल्या पराभवानंतर पक्ष नवीन रणनीती आखेल, स्थानिक नेतृत्वाला बळ देईल आणि नव्या राजकीय समीकरणांची उभारणी करेल, अशी अपेक्षा होती.

मात्र घडले नेमके उलटे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवेळीही सोलापूर आणि माढा लोकसभा क्षेत्रातील नेतृत्वाला संधी न देता बार्शीला प्राधान्य देण्यात आले. आता विधानपरिषद उमेदवारीतही त्याच तालुक्याला संधी मिळाली. त्यामुळे भाजपाची ही राजकीय दिशा नेमकी कोणत्या गणितावर आधारित आहे, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

बार्शी तालुक्याचा भौगोलिक आणि राजकीय संबंध सोलापूर जिल्ह्याशी असला तरी त्याचा प्रभाव पारंपरिकरीत्या उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघाशी अधिक जोडलेला मानला जातो. अशा परिस्थितीत सोलापूर आणि माढा या दोन महत्त्वाच्या लोकसभा क्षेत्रांतील नेतृत्वाला पुन्हा एकदा दुय्यम स्थान का देण्यात आले, हा प्रश्न भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्येही चर्चेचा विषय बनला आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, या निर्णयामागे एक वेगळे गणित दडलेले असू शकते. सोलापूर आणि माढा लोकसभा क्षेत्रांमध्ये भविष्यात प्रभाव टाकू शकणाऱ्या एखाद्या



नेतृत्वाच्या प्रतीक्षेत भाजप आहे का? किंवा भविष्यातील काही राजकीय घडामोडी लक्षात घेऊन या दोन्ही क्षेत्रांसाठी पक्षाने काही 'राखीव पत्ते' जपून ठेवले आहेत का? अशा शक्यतांची चर्चा सुरू झाली आहे.

विशेष म्हणजे, विधानपरिषद उमेदवार निवडीच्या प्रक्रियेत अनेक नावे चर्चेत आली. काही निष्ठावंत कार्यकर्ते आणि नेत्यांची नावेही पुढे करण्यात आली. मात्र अंतिम निर्णय वेगळाच झाला. त्यामुळे निष्ठेपेक्षा राजकीय उपयुक्तता आणि भविष्यातील समीकरणांना अधिक महत्त्व दिले जात असल्याची भावना काही कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. राजकारणात निष्ठा, त्याग आणि दीर्घकाळ पक्षासाठी काम करणाऱ्या नेत्यांचे योगदान यांना पूर्वी मोठे महत्त्व दिले जात असे. मात्र बदलत्या राजकीय परिस्थितीत निवडीचे निकष बदलत चालल्याची चर्चा अनेकदा ऐकायला मिळते. त्यामुळे या निवडीकडेही त्याच दृष्टीने पाहिले जात आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी पालकमंत्र्यांनी बार्शीला संधी दिली आणि आता विधानपरिषद उमेदवार निवडीवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही त्याच तालुक्याला प्राधान्य दिले. दोन्ही निर्णयांमध्ये दिसून येणारे हे साम्य योगायोग मानायचे की ठरवून आखलेली राजकीय रणनीती, याचे उत्तर भविष्यातील राजकीय घडामोडींमधूनच मिळणार आहे.

आजच्या घडीला इतके मात्र निश्चित दिसते की, जिल्ह्यात स्वतःला बलवान मानल्या जाणाऱ्या भाजपाला विधानपरिषदेसाठी उमेदवार निश्चित करण्यात अपेक्षेपेक्षा अधिक वेळ लागला. आणि अंतिम उमेदवारही सोलापूर व माढा लोकसभा क्षेत्राच्या बाहेरील तालुक्यातून निवडला गेला. त्यामुळे सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघांसाठी भाजपाचा एखादा 'बी प्लॅन' अजूनही पडद्यामागे कार्यरत आहे का, हा प्रश्न आगामी काळात अधिक ठळकपणे उपस्थित होण्याची चिन्हे आहेत. राजकारणात प्रत्येक निर्णय हा केवळ नियुक्ती नसतो, तर तो भविष्यातील संदेशही असतो. बार्शीला मिळालेली सलग राजकीय संधी आणि सोलापूर-माढा क्षेत्रातील नेतृत्वाला मिळालेली प्रतीक्षा, यामागील खरी राजकीय कथा पुढील काही महिन्यांत उलगडणार आहे. माढा आणि सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या राजकारणात मोहिते-पाटील घराण्याचे वर्चस्व अनेक दशकांपासून राहिले आहे. या भागातील राजकीय समीकरणे, निवडणुकांचे निकाल आणि सत्तेची गणिते यामध्ये मोहिते-पाटील घटक नेहमीच प्रभावी राहिला आहे.

त्यामुळेच भाजपाने या दोन लोकसभा क्षेत्रांतील कोणत्याही स्थानिक नेत्याला मोठी राजकीय ताकद दिली तरी त्याचा अपेक्षित परिणाम होणार नाही, असा अंदाज पक्षाने बांधला असावा, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विठ्ठलराव वरुडे पाटील यांना 'समाज रत्न पुरस्कार प्रदान

पुणे (स. गांवकरी) : रुग्णसेवा आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी सातत्याने समर्पित भावनेने कार्य करणारे माय माउली केअर सेंटर व लायन्स क्लब ऑफ पुणे कात्रजचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील यांना 'समाज रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माणूस परिवार आदर्श कार्यकर्ता गौरव समिती महाराष्ट्र राज्य या सामाजिक संस्थेच्या वतीने 'हा सोहळा गणेश हॉल न्यू इंग्लिश स्कूल नवी पेठ टिळक रोड पुणे येथील गणेश हॉल मध्ये उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. यामध्ये मा. जिल्हा न्यायाधीश मा.नामदेवराव चव्हाण साहेब पुणे महानगरपालिकेचे नगरसेवक नगरसेविका यांचा समावेश होता. या मान्यवरांच्या हस्ते वरुडे पाटील यांना गौरवण्यात आले. संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष श्री दुशांतराजे जगताप यांनी आपल्या मनोगतात विठ्ठलराव वरुडे पाटील यांच्या कार्याचा आढावा घेतला. गेल्या १५ वर्षांपासून वरुडे पाटील यांनी रुग्णसेवेच्या क्षेत्रात, विशेषतः वृद्धांच्या आरोग्यासाठी जे अखंड कार्य केले आहे, त्याचे त्यांनी विशेष कौतुक केले. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील व्यंगचित्रकार, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचाही सन्मान करण्यात आला.

### एडीबीचा निधी रखडला; तळेगाव-दिघे मार्गे संगमनेर रस्ता पुन्हा वाऱ्यावर!

कोपरगाव (स. गांवकरी) : तळेगाव-दिघे मार्गे संगमनेर या अत्यंत महत्त्वाच्या राज्य मार्गाच्या दुरुस्ती व रुंदीकरणासाठी आशियाई विकास बँकेकडून (एडीबी) अद्याप निधी प्राप्त झालेला नसल्याची माहिती माहिती अधिकारातून समोर आली आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यापूर्वीही या रस्त्याची दुरुस्ती होण्याची शक्यता धूसर बनली असून ग्रामस्थ, विद्यार्थी आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. उत्तर भारताला पुणे तसेच दक्षिण भारताशी जोडणाऱ्या या ३४.२ किलोमीटरच्या मार्गाची अवस्था गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडले असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. वारंवार आंदोलने, रास्ता रोको आणि निवेदने देऊनही प्रश्न कायम असल्याने नागरिकांचा संताप वाढत आहे. सन २०१८ मध्ये या मार्गासाठी सुमारे १८९ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र त्यानंतरही कामाला गती मिळाली नाही. आता पुन्हा आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र राज्य रस्ते सुधारणा प्रकल्पांतर्गत तळेगाव ते जिल्हा हद्द या ४४ किलोमीटरच्या मार्गासाठी ५२८ कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव आहे. मात्र अद्याप निधी प्राप्त झालेला नसल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाने माहिती अधिकारात दिली आहे. दरम्यान, कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्या कार्यालयाकडून या मार्गावरील खराब पट्ट्यांच्या दुरुस्तीसाठी १७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. निविदा प्रक्रियाही सुरू असल्याची माहिती देण्यात आली. मात्र स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे कामास विलंब होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## Ai+ Smartphone ने ₹३५० कोटींहून अधिक महसूल साध्य केला

पुणे : (स. गांवकरी)

Ai+ Smartphone ने आज एक महत्त्वपूर्ण विकासाचा टप्पा जाहीर केला, ज्यामध्ये केवळ मे २०२६ या महिन्यात ३ लाखांहून अधिक युनिट्स स्मार्टफोन विक्री आणि ₹३५० कोटींहून अधिक महसूल प्राप्त झाला. ही कामगिरी भारतातून एक नव्या पिढीचा तंत्रज्ञान ब्रँड उभारण्याच्या Ai+-च्या दृष्टिकोनाला मिळत असलेल्या वाढत्या गतीचे प्रतिबिंब आहे — नवोन्मेष, सुलभता आणि ग्राहक-प्रथम विचारसरणी एकत्र करून नव्या पिढीच्या वापरकर्त्यांसाठी स्मार्टफोन अनुभवाची पुनर्कल्पना केली जात आहे. भारतीय स्मार्टफोन बाजारात प्रवेश केल्यापासून एक वर्षापेक्षा कमी काळात, Ai+ Smartphone देशातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्मार्टफोन ब्रँड्सपैकी एक म्हणून उदयास आले आहे, जे एका साध्या परंतु शक्तिशाली विश्वासाने प्रेरित



आहे: तंत्रज्ञान केवळ काही मोजक्या लोकांचा विशेषाधिकार असू नये, ते सर्वांसाठी सुलभ असले पाहिजे. हा टप्पा Ai+ Smartphone Nova2, Nova2 Ultra & NovaFlip-च्या एप्रिल २०२६ मधील यशस्वी प्रक्षेपणानंतर आला आहे, जे झपाट्याने ब्रँडच्या वाढीचे मुख्य चालकबल बनले आहे आणि नवोन्मेष, डिझाइन व मूल्य एकत्र करणाऱ्या तंत्रज्ञान अनुभवांसाठी भारतीय ग्राहकांची वाढती भूक अधोरेखित करते.

## मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार उघड

### महिला रुग्णांना पुरुष विभागात भरती, प्रसूत महिलांचा आहार बंद

सोलापूर : (स. गांवकरी)

मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार उघड झाला असून महिला रुग्णांना पुरुष विभागात भरती करण्यात आले आहे तर, प्रसूत महिलांचा आहार बंद करण्यात आला आहे गेल्या सहा महिन्यांपासून प्रसूती साठी आलेल्या बाळंतीण महिलाना आहारच देण्यात आला नसल्यामुळे त्या उपाधी राहू लागल्या यामुळे कुटुंबाला घरातील आहार आणून द्यावा लागला, रुग्णालयात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता देखील वाढली असून इथे कोणाचेच लक्ष नाही आमदार समाधान अवताडे हे केवळ नावालाच आमदार असल्याच्या तीव्र तक्रारी तालुक्यातील जनतेमधून केल्या जात आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सोमवारी अचानक मंगळवेढा येथील ग्रामीण



रुग्णालयाला भेट देत तेथील आरोग्य सुविधांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान रुग्णालयातील अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. गेल्या आठवड्यात गावभेट दौऱ्यादरम्यान हाजापूर येथील ग्रामस्थ सिद्धेश्वर बिचुकले यांनी त्यांच्या नातेवाईक महिलेला बाळंतपणासाठी दाखल केल्यानंतर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून अरेरावीची वागणूक, उपचारातील निष्काळजीपणा आणि रुग्णांकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे केली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत त्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता रुग्णालयात भेट दिली. पाहणीदरम्यान रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांनी आरोग्य सेवेतील अनेक त्रुटी खासदार प्रणिती शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिल्या. प्रसूत महिलांना दिला जाणारा आहार गेल्या दीड महिन्यांपासून बंद असल्याचे समोर आले. संबंधित ठेकेदाराची बिले प्रलंबित असल्याने रुग्णांना जेवण पुरवठा होत नसल्याची बाब उघड झाली. तसेच आवश्यक वैद्यकीय यंत्रसामग्रीचा अभाव, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आणि व्यवस्थापनातील ढिसाळपणा स्पष्टपणे दिसून आला. यावेळी सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे महिला व पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था असणे आवश्यक असताना, ज्या विभागात प्रसूत महिलांना दाखल केले जाते त्याच ठिकाणी पुरुष रुग्णांनाही भरती करण्यात आल्याचे आढळून आले. महिलांसाठी स्वतंत्र शौचालय व स्नानगृहाची सुविधा नसल्याने त्यांच्या खाजगीपणाचा आणि सन्मानाचा गंभीर भंग होत असल्याबद्दल खासदार प्रणिती शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. रुग्णालय परिसरातील अस्वच्छता, अपुरी सुविधा आणि प्रशासनाची उदासीनता पाहून संतप्त झालेल्या खासदार प्रणिती शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ सुधारणा करण्याचे आदेश दिले.

## एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट थांबवा

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

वस्तूंच्या छापील किमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दराने विक्री करून ग्राहकांची होणारी आर्थिक फसवणूक थांबवावी, तसेच देशात 'एमआरपी' संदर्भात सक्षम कायदा करण्यात यावा, या मागणीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण मार्गाने जनजागृती आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रशासनाला सादर केलेल्या निवेदनात ग्राहकांच्या विविध ज्वलंत समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले आहे. भारत सरकारने एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) विषयावर तातडीने सक्षम व सुधारित कायदा करावा. तसेच एमआरपीच्या पडताळणीसाठी




एका स्वतंत्र वैधानिक प्राधिकरणाची स्थापना करण्यात यावी.बाजारातील वाढीव एमआरपी, खोटी सूट आणि दिशाभूल करणाऱ्या किमतींवर कडक निर्बंध आणले पाहिजेत. वस्तूंच्या किमतीत पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक उत्पादनावर एमआरपी सोबतच त्याचा मूळ उत्पादन खर्च छापणे कायदेशीररित्या बंधनकारक करावे.सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी निगडित असलेल्या औषध आणि इतर अत्यावश्यक वस्तूंच्या किमतींवर विशेष नियंत्रण प्रणाली लागू करावी, जेणेकरून औषध कंपन्यांकडून होणारी लूट थांबेल. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी म्हणाले, सध्या बाजारपेठेत अनेक ठिकाणी ग्राहकांकडून छापील किमतीपेक्षा (एमआरपी) जास्त दर आकारले जात आहेत. किमतींमध्ये पारदर्शकतेचा मोठा अभाव असून, सर्वसामान्य नागरिकांना दररोज आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे आणि त्यांच्यात जागृती निर्माण व्हावे, म्हणूनच आम्ही संविधानिक व शांततेच्या मार्गाने हे आंदोलन करत आहोत." प्रशासनाने या आंदोलनाची गांभीर्याने नोंद घेऊन, दोषी व्यापाऱ्यांवर आणि फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कडक कायदेशीर कारवाईसाठी हे निवेदन केंद्र व राज्य शासनाकडे त्वरित सादर करावे, अशी नम्र विनंती ग्राहक पंचायतीच्या वतीने करण्यात आली आहे. या आंदोलनात ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शाहूराव औटी,प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, सचिव दिनेश थोरात, प्रांत कार्यकारणीसदस्य अतुल कुऱ्हाडे, महिला अध्यक्षा अमिता कोहली, पद्मा दायमा, उपाध्यक्ष अशोक शेवाळे, सुरेश रहाणे, सह सचिव जितेंद्र पितळे, सीताराम बोरुडे, हरिभाऊ चौधरी, अप्पासाहेब औटी, पारनेर तालुकाध्यक्ष शहाजी पांढरे, सुनील गोरे, डॉ.रजनीकांत पुंड, रामचंद्र सुपेकर, संदीप गवळी, सतीश भोईटे, प्रकाश रासकर, अनंता पवार, रामकृष्ण थोटे, रवींद्र शेळके, गोरख बोडखे, विनोद पेंटा, ऋषिकेश शिंदे, ज्ञानेश्वर फसले, विजय काथवटे, रामचंद्र अनारसे, विजय कवडीवाले, जयश्री घोडके, अर्जुन गोंधळी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने जागरूक नागरिक सहभागी झाले होते.

## अक्षय ऊर्जा स्वीकाराबाबत अवादा ग्रुपची पुण्यात जनजागृती




पुणे : (स. गांवकरी)

अक्षय ऊर्जेबाबत देशभरात जनजागृती वाढवण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या उपक्रमांतर्गत, भारतातील अग्रगण्य एकात्मिक ऊर्जा संक्रमण समूहांपैकी एक असलेल्या अवादा ग्रुपने 'अवादा भारत उदय यात्रा' हा आपला प्रमुख उपक्रम पुण्यात राबविला. अवादा ग्रुपने या माध्यमातून नागरिक, स्थानिक समुदाय आणि विविध घटकांशी शाश्वत ऊर्जा आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीबाबत संवाद साधला. ८ मे २०२६ रोजी नोएडामधून या यात्रेला सुरुवात करण्यात आली. अक्षय ऊर्जा स्वीकार आणि शाश्वत जीवनशैली याबाबत तळागाळात जागरूकता निर्माण करणे, तसेच भारताच्या स्वच्छ आणि अधिक आत्मनिर्भर ऊर्जा भविष्याच्या दिशेने होणाऱ्या संक्रमणाला बळ देणे, हा या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा उद्देश आहे.विशेष डिझाइन केलेल्या या व्हॅनने आतापर्यंत उत्तर प्रदेश, राजस्थान, गुजरात आणि महाराष्ट्र या चार राज्यांसह नऊ शहरांमधून सुमारे १७१४ किमीचा प्रवास पूर्ण केला आहे. प्रत्यक्ष उपक्रम आणि जनसहभाग मोहिमांच्या माध्यमातून ही यात्रा थेट स्थानिक समुदायांशी संवाद साधत आहे.




## घटनात्मक, सामाजिक व प्रशासकीय सुधारणा करावी

### ॲड. कांचन धौडीराम खरात यांची मागणी

सोलापूर : (स. गांवकरी)

ॲडव्होकेट ॲक्ट, १९६१ मध्ये घटनात्मक, सामाजिकव लोकशाही व प्रशासकीय सुधारणा करण्यात यावी अशी ॲड. कांचन धौडीराम खरात यांनी केली आहे. येत्या संसदीय अधिवेशनात ॲडव्होकेट ॲक्ट (सुधारित) कायदा सादर करून ॲडव्होकेट ॲक्ट, १९६१ मध्ये व्यापक घटनात्मक, सामाजिक, लोकशाही व प्रशासकीय सुधारणा तात्काळ करण्याबाबतची मागणी ॲड. कांचन धौडीराम खरात यांनी केली. आहे भारतातील न्यायव्यवस्था ही भारतीय संविधानाच्या मूलभूत रचनेचा अत्यंत महत्वाचा भाग असून वकील व्यवसाय हा न्यायदान व्यवस्थेचा अविभाज्य घटक आहे. ॲडव्होकेट ॲक्ट, १९६१ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या बार कौन्सिल ऑफ इंडिया व विविध स्टेट बार कॉन्सिल्स या संस्था देशातील लाखो वकिलांचे प्रतिनिधित्व करतात. तथापि सध्याच्या कायदेशीर, प्रशासकीय व निवडणूक व्यवस्थेमध्ये लोकशाही प्रतिनिधित्व, सामाजिक समावेशकता, आर्थिक समानता, महिला सहभाग, ग्रामीण प्रतिनिधित्व व पारदर्शकतेचा गंभीर अभाव निर्माण झालेला आहे. सद्यस्थितीत बार कौन्सिल निवडणुका अत्यंत खर्चिक, केंद्रीकृत व प्रभावशाली गटांच्या नियंत्रणाखाली गेल्याची भावना देशातील वकिलांमध्ये निर्माण झाली असून ग्रामीण भागातील, नवोदित, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, महिला, एस.सी. / एस.टी/ ओबीसी, आदिवासी, अल्पसंख्याक व लहान जिल्ह्यातील वकिलांना प्रभावी प्रतिनिधित्व मिळण्यात गंभीर अडचणी येत आहेत. भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६, १९ (१) (सी), ३८ व ३९ ए मधील समानता, सामाजिक न्याय, समान संधी व लोकशाही प्रतिनिधित्वाच्या तत्वांच्या अधीन राहून ॲडव्होकेट ॲक्ट, १९६१ मध्ये खालीलप्रमाणे व्यापक सुधारणा करण्यात याव्यात ही नम्र मागणी आहे. प्रत्येक जिल्ह्यास किमान एक प्रतिनिधित्व देण्याची कायदेशीर सक्ती करण्यात यावी. जेणेकरून ग्रामीण व जिल्हास्तरीय बार असोसिएशन चे प्रश्न थेट मांडले जातील. राज्य बार कौन्सिल मधील निश्चित '२५ सदस्य" मर्यादा रद्द करून संबंधित राज्यातील जिल्हे, वकिलांची संख्या व भौगोलिक परिस्थितीनुसार सदस्यसंख्या निश्चित करण्यात यावी. बार कौन्सिल ऑफ इंडिया मध्ये प्रत्येक राज्यास न्याय्य प्रतिनिधित्व मिळण्यासाठी ॲडव्होकेटची संख्या, राज्याचा आकार, जिल्हे व सामाजिक विविधता याच्या आधारावर नवीन प्रतिनिधित्व प्रणाली लागू करण्यात यावी, महिलांसाठी किमान ३३% आरक्षण (५०% आरक्षण दिल्यास उत्तम) व स्वातंत्र महिला प्रतिनिधित्व अनिवार्य करण्यात यावे. एस.सी., एस.टी., ओबीसी, व्ही. जी.एन.टी. व इ.डब्ल्यू.एस. घटकांसाठी स्वतंत्र प्रतिनिधित्वाची तरतूद करण्यात यावी. युवा व नवोदित वकिलांसाठी स्वतंत्र प्रतिनिधित्व व्यवस्था निर्माण करण्यात यावी. निवडणूक प्रक्रियेमध्ये उमेदवारी शुल्क व प्रचार खर्च व इतर आर्थिक अटींवर कमाल मर्यादा कायदेशीर घालण्यात यावी. सर्व निवडणूक खर्चाचे स्वतंत्र लेखापरीक्षण व सार्वजनिक आर्थिक खुलासा अनिवार्य करण्यात यावा. बार कौन्सिल निवडणुका स्वतंत्र निवडणूक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली घेण्यात याव्यात. ई-नामांकन व जिल्हानिहाय मतदारसंघ प्रणाली लागू करण्यात यावी. सलग अनेक कार्यकाळांवर मर्यादा घालून नवीन नेतृत्वाला संधी देण्यात यावी. बार कौन्सिलच्या सर्व बैठका, ठराव, आर्थिक व्यवहार, वेल्फेअर फंड, निवडणूक निधी व शिस्तभंग कारवाईमध्ये पूर्ण पारदर्शकता अनिवार्य करण्यात यावी. ग्रामीण, आदिवासी व दुर्गम भागातील वकिलांसाठी विशेष कायदेशीर सहाय्य, प्रशिक्षण व प्रतिनिधित्व योजना लागू करण्यात याव्यात. नवोदित वकिलांसाठी किमान मानधन, विमा, निवृत्ती वेतन, आरोग्य सुरक्षा, सामाजिक सुरक्षा व प्रशिक्षण प्रणालीची कायदेशीर तरतूद करण्यात यावी. वकिलांच्या कल्याण निधीच्या वापरावर सार्वजनिक लेखापरीक्षण व माहिती अधिकार कायद्याअंतर्गत पूर्ण पारदर्शकता लागू करण्यात यावी. बार कौन्सिल निवडणूक प्रक्रियेमध्ये पैशाचा प्रभाव, गटबाजी, दबावतंत्र व अप्रत्यक्ष आर्थिक प्रभाव रोखण्यासाठी स्वातंत्र आचारसंहिता लागू करण्यात यावी. बार कौन्सिलच्या सर्व सदस्यांसाठी वार्षिक मालमता जाहीर करणे व हितसंबंध पारदर्शकता अनिवार्य करण्यात यावी. वकिलांच्या तक्रारींचे वेळबद्ध निवारण करण्यासाठी स्वातंत्र्य ग्रवियन्स रेडरेसल मेकॅनिझम स्थापन करण्यात यावा. ॲडव्होकेट ॲक्ट, १९६१ चे संपूर्ण पुनरावलोकन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत न्यायाधीश, वरिष्ठ वकील, महिला प्रतिनिधी, ग्रामीण बार असोसिएशन व सामाजिक न्याय क्षेत्रातील तज्ञ यांची राष्ट्रीय सुधारणा समिती स्थापन करण्यात यावी. देशातील सर्व वकिलांकडून सूचना व हरकती मागवून लोकशाही पद्धतीने सुधारणा प्रक्रिया राबविण्यात यावी. न्यायव्यवस्था ही केवळ शहरापुरते किंवा आर्थिकदृष्ट्या प्रभावशाली गटापूर्ती मर्यादित न राहता देशातील प्रत्येक जिल्हा, प्रत्येक समाजघटक व प्रत्येक वकिलापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे.

# मोगू मोगूची भारतात जागतिक मोहिम सुरू

**पुणे : (स. गांवकरी)**

आजची Gen Z पिढी इंटरनेटवर काहीही म्यूट, ब्लॉक किंवा स्किप करू शकते. पण खऱ्या आयुष्यात अशी कोणतीही सुविधा नसते. डिजिटल जगातील सहज अनुभव आणि दैनंदिन आयुष्यातील अवघड, टाळता न येणारे प्रसंग यातील हाच फरक लक्षात घेऊन मोगू मोगूने आपली नवीन जागतिक मोहीम “वाना स्किप? यू गॉटा च्यू” तयार केली आहे. ही मोहीम 1 जून रोजी सायंकाळी 6 वाजता भारतात सुरू होत आहे. या मोहिमेद्वारे Gen Z ला काल्पनिक ‘स्किप बटण’ विसरून मोगू मोगू च्या खास ‘सिप अँड च्यू’




अनुभवाचा आनंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ही मोहीम थायलंड स्थित सॅप्पे पब्लिक कंपनी लिमिटेड (सॅप्पे) या कंपनीने तयार केली आहे. SAPPE ही मोगू मोगूची मूळ कंपनी असून ‘स्नॅक ड्रिंक’ या श्रेणीची निर्माती आहे. जगभरातील Gen Z तरुणांच्या अनुभवांवर केलेल्या संशोधनातून तीन सर्वात सामान्य आणि अवघड प्रसंग समोर आले. त्यामध्ये “द स्ट्रेंजर आइज़” (सार्वजनिक वाहतुकीत एखाद्या अनोळखी व्यक्तीसोबत नकळत होणारा नजरेचा संपर्क), “द थर्ड व्हील” (जोडप्यांसोबतच्या सहलीत एकटाच सिंगल व्यक्ती असणे) आणि “द फर्स्ट टिंडर डेट” (प्रोफाइलमध्ये दिसणारी व्यक्ती आणि प्रत्यक्षात भेटणारी व्यक्ती पूर्णपणे वेगळी असणे) यांचा समावेश आहे.





पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील शिवनेरी पायथ्याशी वसलेल्या वडज गावातील प्रगतशील शेतकरी तथा हरिभक्त परायण शांताराम चव्हाण..दादा यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ.दैनिक समर्थ गांवकरी समुहाचे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात वाढदिवसानिमित्त विठुरायाची मुर्ती साडी चोळी मिठाई देऊन माता पित्याचा अभिष्टचिंतन करताना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे.. नामांकित उद्योजक तथा प्रगतशील शेतकरी मंगेश चव्हाण

## थोडक्यात बातम्या...



### कळवण - बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्यांचे लाखोचे नुकसान

कळवण (स. गांवकरी) : युरो टु प्रजातीचे कोबीचे बोगस बियाणे व रोपे खराब निघाल्याने मोहमुख ता. कळवण येथील शेतकरी अंबादास जिभाऊ जाधव यांचे एक लाख रुपयापेक्षा जास्त रकमेचे नुकसान झाले आहे. संबधित बालाजी नर्सरीकडून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी श्री जाधव यांनी निवेदनाद्वारे तालुका कृषी अधिकारी वाल्मिक प्रकाश यांचेकडे केली आहे. अंबादास जिभाऊ जाधव, रा. मोहमुख, ता. कळवण, यांनी तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि ४ मे २०२६ रोजी बालाजी नर्सरी, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक येथून " Euro-2 कोबी या जातीची रोपे/बियाणे खरेदी केली होती. सदर खरेदीची रक्कम रु. ६० हजार झाले आहे. हे संपुर्ण रोपे/बियाणे लावल्यानंतर खराब बियाणे निघाले आहे. त्यामुळे माझे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. सदर बियाणे रोपे निकृष्ट व खराब आहे. तरी सदर बियाणे ६०,००० रुपये, १०,००० लागवडीचे, ८,००० निंदनी, २७,००० खत, ५७०० फवारणी औषधे असे एकूण १, लाख १०, हजार ७०० रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. बालाजी नर्सरी, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक व कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी. यंदा कांदा पिकालाही कमी बाजार भाव मिळाला आहे. उत्पादन खर्चही निघाला नाही. त्यात येवढे मोठे नुकसान जर कंपनी करत असेल तर शेतकऱ्याला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय नाही तरी आपण संबंधित प्रकरणाची तात्काळ चौकशी करून पंचनामा करावा व संबंधित नर्सरीवर व कंपनीवर योग्य ती कारवाई करून मला नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी निवेदनात केली आहे.




### दुहेरी उपविजेतेपदाची दमदार कामगिरी

इगतपुरी (स. गांवकरी) : सांगली येथे आयोजित १७ वी राज्यस्तरीय कॅनो स्प्रिंट अजिंक्यपद स्पर्धा २०२५-२६ तसेच राज्यस्तरीय खुला गट ड्रॅगन बोट अजिंक्यपद स्पर्धेत नाशिक जिल्ह्यातील विल्होळी येथील स्वाभिमान बोट क्लबच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत दुहेरी उपविजेतेपद पटकावले. कॅनो स्प्रिंट गटात सर्वसाधारण उपविजेतेपद आणि ड्रॅगन बोट गटातही सर्वसाधारण उपविजेतेपद मिळवत खेळाडूंनी नाशिक जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्वल केले. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाला सांगली नगरीचे युवराज मा. आदित्यराजे पटवर्धन, मुख्य जिल्हा सरकारी वकील मा. प्रमोदजी भोकरे, निवासी उपजिल्हाधिकारी स्नेहल कणीचे मॅडम, महाराष्ट्र कॅनो-कयाक असोसिएशनचे उपाध्यक्ष मा. प्रतापभाऊ जामदार, सचिव सुरेंद्रजी कोरे, भारतीय कॅनो-कयाक संघटनेचे सहसचिव दत्ता पाटील, गणेश बरगाले, रॉयल कृष्णा बोट क्लबचे पदाधिकारी शेखर बजाज, अमोल यादव, विनोद नलवडे, अॅड. अमोल बोलाज, प्रसाद जामदार, अर्चना पाटील मॅडम, अशोक बिडगर, कल्याण मुरकुटे, स्वामी महात्मे, मिथिलेश राजपूत यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, क्रीडाप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थी व विविध स्पर्धा परिक्षेत यश मिळवलेल्याचा सन्मान

अर्धापूर (स. गांवकरी) : नगरपंचायतीच्या वतीने पु.राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात आली. नगर पंचायत प्रशासनाच्या वतीने तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात



आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सौ. वैशालीताई देशमुख प्रमुख उपस्थित सौ.डॉ. दामिनी नितीन हाके,माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे,उपनगराध्यक्ष मुक्तेदर खान,चेअरमन प्रवीण देशमुख,आदी उपस्थित होते. १० व १२ तसेच स्पर्धा परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार नगर पंचायत प्रशासनाने राजमाता पु. अहिल्यादेवी होळकर जयंती दिनी तालुक्यातील गुणवंत विद्यार्थीचा सत्कार करण्यात आला.दहावी बोर्ड परिक्षेत ९० टक्के आणि बारावी बोर्ड परिक्षेत ८५ टक्के गुण मिळवलेल्या व विविध स्पर्धा परिक्षेत यश संपादन केलेल्या २१ विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना स्पर्धेत टिकण्यासाठी यश कसे मिळते त्यासाठी काय परिश्रम घ्यावे लागतात सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे यांनी केले. तर सुत्रसंचलन सौ. अंकिता टिकार यांनी व आभार सुंदर सरगर यांनी मानले यावेळी विद्यार्थी व गावकरी मंडळी उपस्थीत होते.

# बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्याचे लाखावर नुकसान

- बालाजी नर्सरी व बियाणे कंपनीकडून भरपाईची मागणी
- अंबादास जाधव यांचे कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

**कनाशी : (स. गांवकरी)**

बोगस बियाणे व निकृष्ट रोपांमुळे मोहमुख, ता. कळवण येथील शेतकरी अंबादास जिभाऊ जाधव यांचे एक लाख दहा हजार रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. संबंधित बालाजी नर्सरी व बियाणे कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी जाधव यांनी तालुका कृषी अधिकारी वाल्मिक प्रकाश यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अंबादास जाधव यांनी दि. ४ मे २०२६ रोजी बालाजी नर्सरी, दिंडोरी, नाशिक येथून ‘युरो-२’ प्रजातीचे



कोबीचे बियाणे व रोपे ६० हजार रुपयांना खरेदी केली. संपूर्ण रोपांची लागवड केल्यानंतर बियाणे व रोपे निकृष्ट व खराब निघाली. त्यामुळे पीक हातातून गेले व मोठे आर्थिक नुकसान झाले.

निवेदनात जाधव यांनी नुकसानीचा तपशील दिला आहे. बियाणे ६०००० रुपये, लागवड १०००० रुपये, निंदणी ८००० रुपये, खत २७००० रुपये, फवारणी औषधे ५७०० रुपये असे एकूण 1 लाख १० हजार ७०० रुपयांचे नुकसान झाले आहे. “यंदा कांदा पिकालाही बाजारभाव मिळाला नाही. उत्पादन खर्चही निघाला नाही. त्यात बोगस बियाण्यामुळे एवढे मोठे नुकसान झाले. कंपनी जर अशी फसवणूक करत असेल तर शेतकऱ्याला आत्महत्या केल्याशिवाय पर्याय नाही,” अशी व्यथा जाधव यांनी मांडली. संबंधित प्रकरणाची तात्काळ चौकशी करून पंचनामा करावा. बालाजी नर्सरी, दिंडोरी व संबंधित बियाणे कंपनीवर योग्य ती कारवाई करून नुकसान भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी जाधव यांनी केली आहे. कळवण तालुक्यात बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे वारंवार नुकसान होत आहे. कृषी विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# CDMO कार्यक्रमाचे कमर्शियल एक्सीक्यूशन सुरू

**गुरुग्राम : (स. गांवकरी)**

मोरेपेन लॅबोरेटरीज लिमिटेडने आर्थिक वर्ष 2025-26 च्या चौथ्या तिमाहीत (Q4 FY26) दमदार आर्थिक कामगिरी नोंदवली आहे. मागील आर्थिक वर्षाच्या तुलनेत कंपनीचा निव्वळ नफा 69 टक्क्यांनी वाढून 20 कोटी रुपयांवर पोहोचला असून एकूण महसूल 22 टक्क्यांनी वाढून 472 कोटी रुपये झाला आहे. निर्यात व्यवसायातील वाढ आणि मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायातील विस्तारामुळे ही वाढ साध्य झाल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे. कंपनीच्या API (ॲक्टिव्ह फार्मास्युटिकल इंग्रेडिएंट) व्यवसायात चौथ्या तिमाहीत 17 टक्के वाढ झाली, तर मेडिकल डिव्हाइसेस व्यवसायात 31 टक्क्यांची वाढ झाली. संपूर्ण आर्थिक वर्ष FY2025-26 मध्ये कंपनीचा स्टँडअलोन एकूण महसूल




1,700 कोटी रुपयांपेक्षा अधिक झाला असून तो मागील वर्षाच्या तुलनेत 8 टक्क्यांनी अधिक आहे. संचालक मंडळाने आर्थिक वर्ष 2026 साठी भागधारकांना 10 टक्के लाभांश देण्याची शिफारस केली आहे. कंपनीने सलग चौथ्यांदा यूएसएफडीए तपासणी कोणत्याही प्रतिकूल निरीक्षणाशिवाय (Nil 483 Observation) यशस्वीरित्या पूर्ण केल्याची माहिती दिली. याशिवाय दीर्घकालीन उत्पादन कार्यक्रमांतर्गत व्यावसायिक उत्पादनालाही सुरुवात करण्यात आली आहे.

## समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

# देवदूतासारखा धावून आला 'टायगर ग्रुप', प्रवाशांचे वाचवले प्राण!

**मालेगाव : (स. गांवकरी)**

समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असताना, आज पहाटे मालेगाव परिसरात एक थरारक आणि भीषण अपघात घडला . नागपूरहून येणाऱ्या 'संजय ट्रॅव्हल्स'च्या खाजगी बसने एका ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. पहाटे सुमारे २ वाजेच्या सुमारास झालेल्या या अपघातात बसचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला असून, अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले. मात्र, याच दरम्यान शिर्डीकडे चाललेला 'टायगर ग्रुप' वर्धा जिल्हा टीम जखमींसाठी 'देवदूत' ठरला. त्याच वेळी टायगर ग्रुपचे सदस्य समृद्धी महामार्गावरून शिर्डीकडे चालले होते. महामार्गावर अपघात झाल्याचे पाहताच, त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता आपल्या गाड्या थांबवल्या. बसमधून प्रवाशांचा आक्रोश ऐकू येत होता. टायगर ग्रुपच्या सदस्यांनी जीवाची पर्वा न करता तात्काळ मदतकार्य सुरू केले. बसच्या चक्काचूर झालेल्या भागातून जखमी प्रवाशांना अत्यंत काळजीपूर्वक आणि सुरक्षितपणे

> "संकटाच्या प्रसंगी केवळ बघ्याची भूमिका न घेता, टायगर ग्रुपच्या तरुणांनी दाखवलेली तत्परता, सामाजिक बांधिलकी आणि मानवता खरोखरच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या धाडसामुळे अनेक प्रवाशांना वेळेत उपचार मिळणे शक्य झाले."
>
> **— डॉ. तानाजी जाधव (राष्ट्रीय अध्यक्ष, टायगर ग्रुप)**

बाहेर काढले. तात्काळ रुग्णवाहिका आणि महामार्ग पोलिसांशी संपर्क साधून घटनास्थळी मदत बोलावली. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्याची चोख व्यवस्था केली. अपघातामुळे प्रचंड घाबरलेल्या आणि धक्क्यात असलेल्या प्रवाशांना धीर देऊन त्यांची विचारपूस केली. या अत्यंत संवेदनशील आणि धाडसी मदतकार्यात टायगर ग्रुपचे सुनील मांगरूळकर, निलेश गोहत्रे, वैभव उजवणे, शुभम भोयर आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

# मुरकुटे यांनी सर्वसामान्यांसाठी व गावविकासासाठी मोलाचे योगदान दिले – विठ्ठलराव नागवडे

**श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)**

वांगदरी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक लक्ष्मण विठ्ठल मुरकुटे यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ग्रामपंचायत अधिकारी म्हणून कार्यरत असताना मुरकुटे यांनी सर्वसामान्य नागरिकांसाठी तसेच गावविकासासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवून मोलाचे योगदान दिले असल्याचे गौरवोद्गार पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे यांनी काढले.

वांगदरी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे होते.

यावेळी मनोगत व्यक्त करताना सेवानिवृत्त ग्रामसेवक लक्ष्मण मुरकुटे भावूक झाले. ते म्हणाले की, “गेली ३५ वर्षे ग्रामसेवक म्हणून २१ गावांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यापैकी शेवटची तीन वर्षे वांगदरी येथे सेवा करण्याचा योग



आला. ग्रामस्थांचे सहकार्य आणि पाठिंबा यामुळे सेवाकाळातील अखेरचे दिवस अत्यंत आनंददायी आणि उत्साही वातावरणात व्यतीत झाले. सेवाकाळात मला ‘राष्ट्रीय पुरस्काराने’ही सन्मानित करण्यात आले, ही माझ्या प्रामाणिक कार्याची मिळालेली पावती आहे.”

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी मुरकुटे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी सरपंच संजय नागवडे यांनी केले. त्यांनी मुरकुटे यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या कार्यशैलीबाबतचे अनुभव उपस्थितांसमोर मांडले.

यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे, माजी सरपंच आदेश नागवडे, संचालक सुभाष गोरे, माजी चेअरमन रामचंद्र नागवडे, बापूराव कांबळे, विश्वनाथ मोहिते, माजी सरपंच दत्तात्रय मासाळ, काशिनाथ पारखे, शिक्षक नेते आबासाहेब जगताप, तुषार नागवडे आदींनी मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात राजेंद्रदादा नागवडे यांनी प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणे वाटते तितके सोपे नसते, असे सांगत मुरकुटे यांनी सर्वांना सोबत घेऊन उत्कृष्ट कार्य केले असल्याचे नमूद केले. तसेच त्यांनी मुरकुटे दांपत्यास निरोगी व आनंदी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वांगदरी सोसायटीचे चेअरमन राजेंद्र निळकंठ नागवडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन माजी सरपंच महेश नागवडे यांनी केले. या प्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठलराव नागवडे, कारखान्याचे ज्येष्ठ संचालक लक्ष्मण रायकर, सरपंच सौ. सुजाता तुषार नागवडे, उपसरपंच सौ. पुष्पा विश्वनाथ मोहिते, ग्रामपंचायत सदस्य, वांगदरी सोसायटीचे सभासद, संचालक, ग्रामस्थ, महिला व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याच्या ५२ व्या गळीत हंगामाची रोलर पूजा संपन्न

**श्रीगोंदा : (स. गांवकरी)**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना ही तालुक्याच्या विकासाची कामधेनू असून तिचे जतन व संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारी संचालक मंडळ, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगारांची असल्याचे प्रतिपादन कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांनी केले.



कारखान्याच्या सन २०२६-२७ या ५२ व्या गळीत हंगामाच्या रोलर पूजेचा कार्यक्रम मंगळवार, दि. २ जून रोजी कारखान्याच्या इंजिनिअरिंग विभागात उत्साहात पार पडला. यावेळी कारखान्याच्या व्हाइस चेअरमन सौ. मेघाताई औटी यांचे पती संदीप औटी, संचालक एकनाथराव आळेकर, विश्वनाथ गिरमकर, बंडू जगताप आणि आप्पासाहेब धायगुडे यांच्या हस्ते रोलरची विधिवत पूजा करण्यात आली. तसेच कारखाना सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या २२ कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला.

अध्यक्षस्थानावरून बोलताना राजेंद्रदादा नागवडे म्हणाले की, स्वर्गीय शिवाजीराव बापू नागवडे यांनी दुष्काळग्रस्त श्रीगोंदा तालुक्याला सुजलाम-सुफलाम करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच आज कारखाना ५२ व्या गळीत हंगामात प्रवेश करत आहे. या कारखान्याच्या माध्यमातून हजारो कुटुंबांना रोजगार व आर्थिक स्थैर्य मिळाले आहे. मात्र बदलत्या काळात सहकारी साखर उद्योगासमोर अनेक आव्हाने उभी राहिली असून त्यांचा सामना करत कारखान्याचे संरक्षण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

येत्या गळीत हंगामात आठ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्याकडे गळीतासाठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. ऊसदराच्या बाबतीत नागवडे कारखाना कधीही मागे राहिलेला नाही आणि भविष्यातही राहणार नाही, अशी ग्वाही देत उच्चांकी गाळप झाल्यास शेतकऱ्यांना अधिक चांगला दर देणे शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात संचालक सुभाष शिंदे यांनी साखर उद्योगातील कामगारांचे महत्त्व अधोरेखित केले. कामगारांनी आपली जबाबदारी सक्षमपणे पार पाडल्यास कारखान्याचे गाळप सुरळीत आणि यशस्वीपणे होऊ शकते, असे ते म्हणाले. नागवडे कारखान्याचे कर्मचारी अभिमानास्पद कामगिरी करत असून पुढील काळात अधिक जबाबदारीने कार्य करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सेवानिवृत्त कर्मचारी संजय मेहेत्रे आणि किसन कोल्हटकर यांनी आपल्या सेवाकालातील अनुभव कथन करत कारखाना व नागवडे परिवाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास संचालक राकेश पाचपुते, श्रीनिवास घाडगे, योगेश भोईटे, शरद जगताप, लक्ष्मण रायकर, प्रशांत दरेकर, प्रा. सुरेश रसाळ, प्रशांत शिपलकर, विठ्ठल जंगले, सावता हिरवे, भाऊसाहेब बरकडे, मारुती पाचपुते, विठ्ठल भोईटे, कामगार युनियनचे अध्यक्ष रामभाऊ लबडे, कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे, सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कामगार व सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)


आंतरभारती रूरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट संचलित,
आनंदगड शैक्षणिक संकुल
आनंदगड, वीरगाव ता. अकोले, जि. अहिल्यानगर
२५
वर्ष १९९९-२०२४
पाल्याच्या उज्वल भविष्यासाठी आनंदगड शैक्षणिक संकुल येथे स्वप्न प्रत्यक्षात साकारले जातात!
(D.T.E., MSBTE, DBAT University P.C.I. Approved)
DTE Code 5480
मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी
डी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM)
कालावधी २ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
बी फार्मसी
पात्रता १२ वी पास (PCB / PCM & CET)
कालावधी ४ वर्ष
प्र.क्षमता ६० विद्यार्थी
विद्यार्थ्यांसाठी बस सुविधा उपलब्ध!
- संपर्क -
7709203202
9421190696 I 9689758321
ग्रामीण महाराष्ट्रातील ISO मानांकित शाळा
धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडिअम स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज
के जी ते १२ वी विज्ञान शाखा
(इंग्रजी माध्यम)
अत्यल्प फी सर्वोत्कृष्ठ शिक्षण
आपल्या पाल्याच्या शालेय प्रवेशासाठी संस्कारक्षम इंग्रजी माध्यमाची प्रयोगशील शाळा
- संपर्क -
9158077688
7875074070 I 9975276670
आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज
पत्ता: आनंदगड शैक्षणिक संकुल, आनंदगड, वीरगांव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर
DTE, Govt of Maharashtra M.S.B.T.E., Mumbai AICTE, New Delhi Approved
सिव्हिल इंजिनिअरिंग 60
मॅकेनिकल इंजिनिअरिंग 60
कॉम्प्युटर इंजिनिअरिंग 60
इलेक्ट्रिकल अॅण्ड इलेक्ट्रॉनिक्स 60
आर्टिफिशीअल इंटेलिजीअंस अॅण्ड मशीन लर्निंग 60
DTE Code 05662
- संपर्क -
9209645837 I 9922545516
9765431168 I 7028724045 I 9922161686
महाराष्ट्र शासन वैद्यकिय शिक्षण व
औषधी द्रव्य विभाग महाराष्ट्र कौन्सिल ऑफ अॅक्युपंक्चर,मुंबई
- मान्यता प्राप्त वैद्यकीय अभ्यासक्रम -
Anandgad Virgaon
मातोश्री गंगुबाई शिंदे अॅक्यूपंक्चर कॉलेज अॅण्ड हॉस्पिटल
डिप्लोमा इन अॅक्युपंक्चर थेरपी (DAT)
प्रवेश क्षमता ५० विद्यार्थी
डिप्लोमा कालावधी २ वर्षे
शैक्षणिक पात्रता इ. १२ वी पास
सुविधा
सर्व सुविधायुक्त भव्य कॉलेज व हॉस्पिटल इमारत
तज्ञ व अनुभवी प्राध्यापक व अॅक्युपंक्चरिस्ट
अॅक्युपंक्चर उपचार पद्धती सुविधा
वसतिगृह सुविधा उपलब्ध
- संपर्क -
9011271729
9834719663 I 7028724045
॥.सुजाता॥ अकोले 9970095289

# राष्ट्रीय अध्यक्षांच्या महाराष्ट्र दौऱ्याने समाजात नवचैतन्य!

## संघटनेच्या नावाचा गैरवापर करणाऱ्यांना जेलमध्ये टाकणार – संजयभाई पटेल

पनवेल : (स. गांवकरी)





अखिल भारत गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल (भोपाळ), राष्ट्रीय कोषाध्यक्ष मनोजभाई झा आणि राष्ट्रीय कार्यालय मंत्री निलेशभाई शाह यांच्या मुंबई, ठाणे, शिर्डी व पुणे दौऱ्यामुळे महाराष्ट्रातील गुजराती समाजामध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. विविध शहरांमध्ये आयोजित बैठका, समाजबांधवांशी संवाद आणि संघटनात्मक कार्यक्रमांमुळे समाजात नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून संघटन बळकटीसाठी हा दौरा महत्त्वपूर्ण ठरला आहे. पनवेल येथे आयोजित विशेष बैठकीत समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल यांनी संघटनेच्या नावाचा गैरवापर करणाऱ्या व्यक्तींविरोधात कठोर भूमिका घेत, अशा व्यक्तींना कोणतीही गय केली जाणार नसून आवश्यक असल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून जेलमध्ये टाकण्यात येईल, असा स्पष्ट इशारा दिला. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गुजराती समाजाच्या सेवाभावी परंपरेचे कौतुक केले. "व्यवसायातून मिळालेला नफा समाजाच्या गरजांसाठी खर्च करण्याची संस्कृती गुजराती समाजाने देशासमोर आदर्श म्हणून उभी केली आहे. समाजसेवा, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक बांधिलकी यामध्ये गुजराती समाजाचे योगदान उल्लेखनीय आहे. समाजसेवक नानजीभाई ठक्कर यांचे कार्य कायम स्मरणात राहील," असे ते म्हणाले. बैठकीत अखिल भारत गुजराती समाजाच्या भावी योजना, संघटन विस्तार, युवकांचा सहभाग, महिला सक्षमीकरण, शैक्षणिक उपक्रम आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय फुलसुंदर यांनी केले. प्रास्ताविकात ज्येष्ठ समाजसेवक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांनी समाजाच्या एकजुटीसाठी मजबूत संघटन उभारणी आणि स्वतंत्र समाजभवनाची आवश्यकता अधोरेखित केली. उपाध्यक्ष मंजुल शाह यांनी गेल्या चार वर्षांत राबविण्यात आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सेवाभावी उपक्रमांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला.

मार्गदर्शन करताना संजयभाई पटेल यांनी एकता, बंधुता आणि स्वाभिमान या त्रिसूत्रीवर भर देत समाजाच्या विकासासाठी सामूहिक सहभागाची गरज व्यक्त केली.

धुळे गुजराती समाजाने समाजभवनासाठी जागा खरेदी केल्यास आर्थिक मदत देण्याची घोषणा त्यांनी केली.

तसेच गुजरात शासन, एनआरजी फाउंडेशन आणि देशभरातील गुजराती समाजाच्या सहकार्याने आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

यावेळी त्यांनी गुजरात शासनाच्या नॉन रेसिडेंट गुजराती (एनआरजी) फाउंडेशनच्या विविध योजनांची माहिती दिली. एनआरजी कार्ड, गुजरात भ्रमण योजना तसेच गुजरातबाहेरील गुजराती समाज संस्थांना मालमत्ता खरेदी, बांधकाम, विस्तार व दुरुस्तीसाठी मिळणाऱ्या आर्थिक सहाय्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, दैनिक समर्थ गांवकरी समूह आणि एन.के.टी. ट्रस्ट यांच्या वतीने अखिल भारत गुजराती समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष संजयभाई पटेल, राष्ट्रीय कोषाध्यक्ष मनोजभाई झा आणि राष्ट्रीय कार्यालय मंत्री निलेशभाई शाह यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना साईबाबांची मूर्ती, शाल व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या सत्कार सोहळ्यास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, ज्येष्ठ समाजसेवक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), दैनिक समर्थ गांवकरी मुंबई मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, मुंबई क्राईम रिपोर्टर महेश जाधव तसेच गुजराती समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुंबई, ठाणे, पुणे आणि शिर्डी परिसरातील गुजराती समाजामध्ये या दौऱ्यामुळे नव्या आशा निर्माण झाल्या असून संघटनात्मक बळकटी, समाजहिताच्या योजना आणि विकासात्मक उपक्रमांना गती मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी महेश जाधव यांनी आभार मानले.

---

## थोडक्यात पण महत्वाचे





### डॉ. वृषाली एमेकर , अभया लोहगावकर नारी गौरव पुरस्काराने सन्मानित

पुणे (स. गांवकरी) : मुदखेड तालुक्यातील डॉ. वृषाली माधवराव एमेकर ग्रामीण रुग्णालय अधीक्षक मुदखेड आरोग्य विभागात यांनी समाज हितासाठी केलेल्या उल्लेखनीय व प्रेरणादायी कार्याबद्दल दैनिक चालू वार्ता पुण्याच्या वतीने नारी गौरव पुरस्कार 2026 देऊन त्यांना पुणे येथे सन्मानित करण्यात आला आरोग्य विभागात विविध योजनांची माहिती देऊन गोरगरीब रुग्णांना त्यांचा लाभ मिळवून देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्नाने रुग्णांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यांच्या सहकार्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे डॉ . वृषाली एमेकर यांना नारी गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचा अभिनंदनचा वर्षा होत आहे. अभया अरुणराव लोहगावकर उपप्राचार्य महात्मा गांधी विद्यालय मुदखेड यांना शैक्षणिक क्षेत्रामध्ये यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल दैनिक चालू वार्ता नारी गौरव पुरस्काराने स्वारगेट पुणे येथे सन्मानित करण्यात आला राज्यभरातून विविध क्षेत्रातील महिलांचे मोठी उपस्थिती होती यावेळी दैनिक चालू वर्षाचे मुख्य संपादक डीएस लोखंडे पाटील त्यांच्या सौभाग्यवती लोखंडे ताई पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका , गजानन कदम, माधव गोटमवाड मुदखेड चे पत्रकार नामदेव राहेरे , बारड पत्रकार अमोल टेकले यांची उपस्थिती होती. महात्मा गांधी विद्यालयाचे उपप्राचार्य अभया लोहगावकर यांना नारी गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आला. त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल मुदखेड चे माजी नगराध्यक्ष तथा महात्मा गांधी विद्यालयाचे अध्यक्ष , प्राचार्य नाईक सर सहशिक्षिका अलका मोरे, अभया लोहगावकर यांना नारिगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी, रामप्रसाद सोनी, शंकरराव पचलिंग , लक्ष्मण सोनटक्के शाळेच्या शिक्षकांनी त्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करून शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

### तामस्यात अन्न भेसळीवर एका दशकांत एकही कारवाई नाही

तामसा (स. गांवकरी) : तामसा व परिसरात गेल्या एका दशकांत अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अन्न भेसळ, दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, चाट भंडार, बेकरी, किराणा दुकाने तसेच खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची कोणतीही तपासणी अथवा कारवाई झाल्याची नोंद नसल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. तामसा हे व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असून परिसरातील अनेक गावांतील नागरिक येथे दैनंदिन खरेदीसाठी येतात. दूध व दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, चाट भंडार, बेकरी उत्पादने, थंड पेये, खाद्यतेल, मसाले तसेच विविध अन्नपदार्थांची मोठ्या प्रमाणावर विक्री होत असते. मात्र अन्न व औषध प्रशासनाकडून या पदार्थांच्या गुणवत्तेची नियमित तपासणी होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. संबंधित विभागाकडून नमुने संकलित करून प्रयोगशाळा तपासणी, परवाने, स्वच्छता व गुणवत्ता मानकांची पडताळणी करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे मत आहे. नियमित तपासणी होत नसल्यामुळे भेसळयुक्त अथवा निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांसाठी अशा पदार्थांचे सेवन धोकादायक ठरू शकते.तामसा परिसरात अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवून दूध, मिठाई, खाद्यतेल, मसाले, शीतपेये तसेच इतर खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, नव्याने रुजू झालेले आयुक्त तुकाराम मुंढे यांनी व्यक्तिगत लक्ष देऊन परिसरात होतं असलेल्या भेसळखोरीवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुर्वणसंधी

नांदेड (स. गांवकरी) : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Service (CDS) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र नाशिक रोड नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक-युवतीसाठी १५ जून ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत CDS कोर्स क्र. 67 आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थीनी १४ जून २०२६ सकाळी १० वा. प्रशिक्षण केंद्रात उपस्थित रहावे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थीना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. नांदेड जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा संनिक कल्याण कार्यालय नांदेड येथे 7 जून 2026 रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare Pune यांच्या वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन DSW Portel (Resources - PCTC Nshik-CDS-६७) किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या, प्रवेशपत्र, त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

---

## साखळी उपोषणानंतर डुबुकवाड यांचे आमरण उपोषण सुरू!

मुदखेड : (स. गांवकरी)

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उभारणी करण्यासाठी रीतसर परवानगी मिळावी, यासाठी वारंवार अर्ज करूनही प्रशासनाकडून परवानगी मिळत नसल्याने संतप्त झालेले मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते मारोती शिवाजी डुबुकवाड यांनी १९ दिवसांच्या साखळी उपोषणानंतर दि.१ जून पासुन आमरण उपोषण सुरू केले आहे. मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार,पुतळा उभारणीच्या परवानगीसाठी मारोती डुबुकवाड हे दि. १२ मे पासून सातत्याने साखळी उपोषणाला बसले होते. मात्र,१९ दिवस उलटूनही मुदखेड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी अद्याप उपोषणस्थळाला भेट देऊन त्यांची साधी विचारपूसही केली नाही. प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा थेट आरोप आंदोलकाने निवेदनाद्वारे केला आहे. प्रशासनाच्या या उदासीन आणि आडमुठ्या धोरणामुळे अखेर दि. १ जून रोजी पासुन आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. 'त्या' तीन अधिकाऱ्यांवर संपूर्ण जबाबदारी उपोषणकर्ते मारोती डुबुकवाड यांनी दिली जिल्हाधिकारी, आणि पोलीस प्रशासनाला लेखी पत्र देऊन इशारा दिला आहे की , या उपोषणादरम्यान त्यांच्या जीवाला काही बरे-वाईट झाल्यास त्याला खालील व्यक्ती पूर्णपणे जबाबदार राहतील: मुख्याधिकारी (न.प मुदखेड) नगराध्यक्ष मुदखेड , इंजिनियर (न.प मुदखेड) जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेण्याची मागणी "नगर परिषदेने तात्काळ पुतळा उभारणीचा ठराव घेऊन तो जिल्हाधिकारी यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवावा," अशी मागणी उपोषणकर्त्याने केली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी या गंभीर प्रकरणात स्वतः लक्ष घालून तात्काळ दखल घ्यावी, अशी विनंतीही पत्राद्वारे करण्यात आली आहे.

---

## वडिलांचा व भावाचा खून करणारा आरोपी गजाआड

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील पारगाव तर्फे मढ गावच्या हद्दीत बगाडवाडीच्या शिवेवर राहत असलेल्या मुकणे कुटुंबात अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून मुलाने झोपेत असलेल्या वडीलांचा व सख्या भावाचा दगडाने ठेचून हत्या केली असल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली असल्याची माहिती ओतूरचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली.

जयराम महादू मुकणे (वय ६५), राजेंद्र जयराम मुकणे (वय ३३) असे हत्या झालेल्या वडील व भावाचे नावे असून त्यांची हत्या बाबजी जयराम मुकणे (वय ३२) याने केली असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत स्थानिकांकडून मिळालेली माहिती अशी की, बाबजी मुकणे व त्यांचे वडील जयराम मुकणे व राजेंद्र मुकणे हे एकत्र एका झोपडी वजा घरात राहत होते. मंगळवारी रात्री सर्व एकत्र झोपले होते. त्यावेळी त्यांच्यात किरकोळ वाद झाला. या वादात बाबजी याला राग अनावर झाल्याने त्याने दगडाने ठेचून त्यांची हत्या केली. व तो तसाच रात्रभर त्यांच्या बाजूलाच झोपून राहिला. सकाळी परिसरातील नागरिक शेळ्या चारण्यासाठी त्याठिकाणी आले असता त्यांना हा प्रकार दिसला. त्यानुसार त्यांनी तातडीने पोलिसांना या घटनेची माहिती दिली. त्यानंतर ओतूर पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली व पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी ओतूर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केला आहे.

सदर घटनेबाबत मयताचा मुलगा युवराज जयराम मुकणे (वय-२७ वर्षे, व्यवसाय - मजुरी, जात-हिंदू कातकरी रा. बगाडवाडी, पारगाव तर्फे मढ ता. जुन्नर जि.पुणे) याने ओतूर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार बाबजी मुकणे यांस ताब्यात घेतले असल्याचे बाजगिरे यांनी सांगितले. पुढील तपास ओतूर पोलिस करत आहेत.

बाबजी याचे लग्न झालेले होते. परंतू त्याची बायको त्याच्याबरोबर राहत नव्हती. त्यामुळे तो वैफल्यग्रस्त झाला होता. त्याचे वडिलांबरोबर नेहमी भांडणे व्हायचे. त्याचा त्याला खूप राग यायचा. तो कोणाबरोबर भांडण झाले तर त्यांना शिव्या द्यायचा. चक्रमवाणी वागायचा. भांडण झाल्यावर तो कोठेही रानात निघून जायचा. काही दिवसांपूर्वी सासरे आमच्याकडे राहत होते पण सासऱ्यांना बाबजीची नेहमी काळजी वाटायची. बाबजीला खायला मिळतेय की नाही म्हणून काही दिवसांपूर्वीच सासरे त्याच्याकडे आले होते. बाबजीच्या विक्षिप्त स्वभावामुळे रागाच्या भरात त्याने वडील व भावाला मारून टाकले असे सुनबाईने सांगितले.

---

## पोलीसावर हल्ला करणाऱ्या आरोपीला ठोकल्या बेड्या



इगतपुरी- : (स. गांवकरी)

कायद्याचा कोणताही धाक न बाळगता, जिल्ह्याबाहेर हद्दपार केलेला एक सराईत गुन्हेगार पुन्हा नाशिक जिल्ह्यात आल्याचे समोर आले आहे. घोटी पोलिसांनी तातडीने कारवाई करत या आरोपीला त्याच्या घरातून ताब्यात घेतले आहे. आरोपीने पोलिसांना पाहून पळून जाण्याचा व त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्याला शिताफीने अटक केली. त्याच्याकडून एक घातक 'गुप्ती' जप्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी निलेश गणेश भगत (वय २६, रा. इंदिरानगर, घोटी, ता. इगतपुरी, जि. नाशिक) याच्या गुन्हेगारी कारवायांना लगाम घालण्यासाठी सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी (इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग) यांनी २९ एप्रिल २०२६ रोजी त्याला नाशिक जिल्ह्यातून ६ महिन्यांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार २७ मे २०२६ रोजी त्याला जिल्ह्याच्या सीमेबाहेर सोडण्यात आले होते.

हद्दपारीचा आदेश असतानाही आरोपी निलेश भगत हा १ जून २०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास घोटी येथील आपल्या राहत्या घरी चोरून परत आला. याची गुप्त माहिती मिळताच घोटी पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई प्रकाश ज्ञानेश्वर कासार हे सहकाऱ्यांसह त्याला पकडण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. पोलीस घरी आल्याचे पाहताच आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याला घेरले असता, त्याने फिर्यादी पोलीस कर्मचाऱ्यांसोबत जोरदार झटापट केली. तो पोलिसांच्या अंगावर धावून गेला आणि धक्काबुक्की करून त्याने सरकारी कामात अडथळा आणला. मात्र, घोटी पोलिसांच्या पथकाने त्याला पळून जाण्याची संधी न देता जागेवरच बेड्या ठोकल्या.

अटक केल्यानंतर पोलिसांनी संशयित आरोपी निलेश भगत याची अंगझडती घेतली. त्याच्या कमरेला ५०० रुपये किमतीची, काळ्या रंगाची बटन असलेली ४९ सेमी लांबीची घातक गुप्ती (३२ सेमी लांबीचे टोकदार व धारदार पाते असलेले शस्त्र) मिळून आली. पोलिसांनी हे हत्यार जप्त केले आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार प्रकाश कासार यांच्या फिर्यादीवरून आरोपी निलेश भगत याच्याविरुद्ध घोटी पोलीस ठाण्यात बी.एन.एस. (भारतीय न्याय संहिता) कलम १३२, ११५(२) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ आणि भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय शिंदे, पोलीस उपनिरीक्षक प्रतीक भिंगारदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार सुनील पाटील, प्रकाश कासार लक्ष्मण धकाते, संतोष नागरे, प्रकाश कासार, योगेश शिंदे वैशाली डावरे हे पथक तपास करीत आहेत.

---

## परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्री केल्यास कारवाई

नांदेड : (स. गांवकरी)

राज्यातील शेतमाल खरेदी-विक्री व्यवसायासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ आणि नियम, १९६७ अंतर्गत आवश्यक परवाना घेणे बंधनकारक आहे. कोणत्याही व्यापाऱ्याने, संस्थेने, शेतकरी उत्पादक कंपनीने अथवा शेतमाल व्यापाराशी संबंधित इतर घटकांनी आवश्यक परवान्याशिवाय शेतमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करू नये. अन्यथा संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे पणन संचालक शरद जरे यांनी दिला आहे. राज्यातील विविध भागांमध्ये अनेक व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतमालाची खरेदी-विक्री विनापरवाना होत असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयाला प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असतानाही काही व्यापारी व संस्था परवान्याविना शेतमाल व्यापार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र शासनाने दि. ५ जुलै २०१६ रोजी अध्यादेश क्रमांक १५ राजपत्रात प्रसिद्ध केला असून, त्याच्या अंमलबजावणीबाबतच्या सूचना ८ जुलै २०१६ रोजी निर्गमित करण्यात आल्या होत्या. तसेच ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या राजपत्रानुसार मुख्य अधिनियमाच्या कलम ६ (२) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या सुधारणेनुसार कलम ५(ड) अंतर्गत परवाना घेणे आवश्यक राहील; मात्र अशा परवानाधारकांकडून बाजार समितीला कोणतेही बाजार शुल्क आकारता येणार नाही. कायद्यातील कलम ५(ड) नुसार थेट पणन, खाजगी बाजार शेतकरी-ग्राहक बाजार आणि ई-ट्रेडिंग प्लॅटफॉर्म या प्रयोजनांसाठी परवाने देण्यात येतात.

---

## श्रीमद्भागवत सप्ताह ज्ञानयज्ञात अध्यात्म, संस्कार आणि एकात्मतेचा संदेश!

मुंबई, विक्रोळी : (स. गांवकरी)



श्री विक्रोळी सार्वजनिक मंदिर बोर्ड आयोजित सषष्ठम श्रीमद्भागवत सप्ताह ज्ञानयज्ञ सोहळा अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या पवित्र धार्मिक कार्यक्रमाला समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, धर्मप्रेमी नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी ज्येष्ठ समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला), पूज्य कथाकार युवा कथाकार श्री जिग्नेशभाई जयेशभाई जोशी महाराज (द्वारकावाला), पूज्य आचार्यपदावर बिराजमान श्री नितेशभाई हरीशंकर जोशी, आमदार सुनीलभाऊ राऊत, नगरसेविका सौ. सुनीता जाधव, श्री राजूभाई रामाणी, श्री धीरूभाई मिराणी, श्री जिग्नेशभाई कतीरा, श्री प्रवीणभाई पंचाल, श्री शेखरभाऊ जाधव (उपविभाग अध्यक्ष, शिवसेना उबाठा), श्री अजितभाई चौहान, श्री देवळकर, श्री प्रफुलभाई परीख, श्री हरेशभाई ठक्कर, डॉ. हरेशभाई पंचाल, श्री भगवानजीभाई पंचाल, श्री संजयभाऊ दिना पाटील, सौ. रश्मिताई पहुडकर (शिवसेना महिला संघटना), नगरसेवक श्री राजेश सोनवणे, शिवशक्ती महिला मंडळ विक्रोळी यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री नानजीभाई ठक्कर म्हणाले की, "श्रीमद्भागवत हे केवळ एक पुराण नसून मानवाला सत्य, धर्म, भक्ती आणि सदाचाराचा मार्ग दाखवणारे दिव्य मार्गदर्शन आहे. अशा ज्ञानयज्ञाचे आयोजन करून विक्रोळी सार्वजनिक मंदिर बोर्डाने समाजात अध्यात्म, संस्कार आणि एकात्मतेचा संदेश पोहोचवण्याचे महान कार्य केले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात अध्यात्माची गरज अधिक आहे." कथाकार श्री जिग्नेशभाई जोशी महाराज यांनी आपल्या रसाळ वाणीमधून भागवत महात्म्य सांगताना नमूद केले की, "भागवत कथा आपल्याला भगवान श्रीकृष्णांच्या जीवनातून प्रेम, करुणा, कर्तव्य आणि भक्ती यांचे महत्त्व शिकवते. या सप्ताहाच्या माध्यमातून प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडावे आणि समाजात सद्भावना वाढावी, हीच भागवत कथेमागील भावना आहे."

आमदार सुनीलभाऊ राऊत यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, "या भव्य आणि यशस्वी आयोजनासाठी सर्व आयोजक, कार्यकर्ते, दाते आणि स्वयंसेवक यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. विशेषतः कथाकार श्री जिग्नेशभाई जोशी महाराज यांचे ज्ञानामृत समाजाला लाभत आहे, याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करतो."

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी भगवान श्रीकृष्णांच्या चरणी प्रार्थना करून समाजात सद्भावना, शांतता, बंधुभाव आणि प्रगती नांदावी, अशी भावना व्यक्त केली.

यावेळी श्री प्रफुलभाई परीख यांनी ज्येष्ठ समाजसेवक श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर यांचा विशेष सन्मान करून समाजकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि सेवाभावी कार्याचा गौरव उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात केला. संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडला असून श्रीमद्भागवत सप्ताह ज्ञानयज्ञामुळे विक्रोळी परिसरात अध्यात्मिक ऊर्जा, संस्कार आणि सामाजिक ऐक्याचा संदेश पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# थोडक्यात पण महत्वाचे



## भाजपा कार्यालयात गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

- भारतीय जनता पार्टीतर्फे स्मृतीदिनी आठवणींना उजाळा

नाशिक (स. गांवकरी) : भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि युतीचे शिल्पकार माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे यांचा स्मृतीदिन वसंतस्मृती कार्यालयात भाजपा नाशिक महानगर जिल्हा अध्यक्ष सुनिल केदार, सुजाता करजगीकर, बापु पिंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा झाला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. गोपीनाथ मुंडे आणि नाशिकचे नाते अतूट होते. ते प्रत्येक कार्यकर्त्याची आस्थेने विचारपूस करीत. आणीबाणीच्या काळात ते नाशिकच्या तुरुंगात होते. त्यामुळे नाशिकचे नेते आणि कार्यकर्ते त्यांना जवळचे वाटत. वकृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व या गुणांच्या जोरावर त्यांनी अल्पावधीतच राजकारण आणि समाजकारणात आपल्या नावाचा आगळा ठसा उमटविला असे सांगून सुनिल केदार यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या जीवनाचे विविध पैलू उलगडून दाखविले. यावेळी सोनल दगडे, डॉ.वैशाली काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महानगर सरचिटणीस सुनिल देसाई, काशिनाथ शिलेदार, प्रविण भाटे, प्रकाश चकोर, राजेंद्र मोरे, विनायक कस्तुरे, शंतनु शिंदे, ज्योती चव्हाणके, छाया देवांग, प्रशांत वाघ, मयुर गऊल, दिनेश भोसले, हेमंत शिंदे, बाबुराव पाटील, प्रदिप पाटील, गणेश आवनकर, दत्तात्रय नागरे, दिपक पाटील, अनिता भामरे, दिलीप देवांग, दयाराम पाटील, रफिक शेख, शादाब बागवान, सुनिल गोन्हे, दिपक देव, रिझवाना, मुनाफ शेख, मोहन आढाव, महेश भामरे, देवेंद्र चुंभळे, अभिनव यादव आदीसह मान्यवर उपस्थित होते.

## उच्च उत्पन्न गटातील १०हजार पेक्षा अधिक लाभार्थ्यांना नोटीसा

राजगुरुनगर (स. गांवकरी) : शासनाच्या राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानांमार्फत मोफत धान्याचा लाभ घेणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लाभार्थ्यांवर प्रशासनाने कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे. खेड तालुक्यातील १९४ स्वस्त धान्य दुकानांमधून लाभ घेणाऱ्या सुमारे १० हजार ८४७ लाभार्थ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या लाभार्थ्यांना ७ मेपासून धान्य वितरण बंद करण्याबाबत नोटीस देण्यात आली असून, त्यांनी आपला खुलासा सादर करावा, असे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. अशी माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेंडसे यांनी दिली आहे. शासनाची मोफत धान्य वितरण व्यवस्था हि गोर गरीब ,गरजू कुटुंबासाठी आधार देणारी ठरली असली तरी आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेले मोफत धान्याचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.शासनाने मिशन सुधार कार्यक्रमांतर्गत करण्यात आलेल्या पडताळणीत आयकर विवरणपत्र (ITR) भरणारे, स्वतःच्या नावावर व्यावसायिक फर्म असलेले तसेच करदाते असलेल्या १० हजार ८४७ लाभार्थ्यांची नावे समोर आली. त्यानुसार संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

## अहिल्यानगर शहराचे आमदार अचानक कसे हिंदुत्ववादी होतात?



अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर शहराचे आमदार कशा प्रकारे जिंकतात, त्याच्यासाठी काय काय उपद्व्याप केले जातात, अचानक ते कसे हिंदुत्ववादी होतात, हे इथल्या जनतेला चांगलेच माहिती आहे. पण या भागातला मूळ पक्ष जो आहे, तो शिवसेनाच आहे. लोकांमध्ये रुजलेला पक्ष शिवसेना आहे, असे म्हणत नव हिंदुत्ववाद्यांवर शिवसेनेचे नेते खा. संजय राऊत यांनी जोरदार प्रहार केला. अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता शिर्डी येथे पत्रकार परिषदेत पत्रकारांशी संवाद साधताना खा. राऊत बोलत होते. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख आ. सुनील शिंदे, अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे, जिल्हाप्रमुख सचिन कोते, जगदीश चौधरी, राजेंद्र दळवी उपस्थित होते. तत्पूर्वी खा. राऊत यांनी हॉटेल 'सन अँड सँड' येथे अहिल्यानगर शहर शिवसेनेचा संघटनात्मक आढावा घेतला. खा. राऊत म्हणाले, निवडणूक हरली म्हणजे त्या पक्षाला कमजोरी आली, तो पक्ष नष्ट झाला, असे होत नाही. विशेषतः शिवसेनेच्या बाबतीत तरी नाहीच नाही. महाराष्ट्रातला सर्वांत जुना पक्ष शिवसेना आहे. अडीच वर्षे आता कोणालाही निवडणुका नाहीत. हा सर्व काळ आम्ही पक्षबांधणीसाठी झोकून देणार आहोत. काल मी इथे आलो, लोकांना भेटलो. प्रत्येकजण जिद्दीने कामाला लागला आहे. या जिल्ह्यात कोण ओरिजिनल आहे? सगळे मूळचे काँग्रेसवाले! आता आपली संस्थानं वाचवण्यासाठी शेपट्या घालून भाजपात गेलेत. जेव्हा आमच्याकडे सत्ता होती, तेव्हा हे सगळे लोक हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पायाशी बसायचे. अशा लोकांना पक्ष वगैरे काही नसतो. जिथे सत्तेची हवा आहे, तिथे ते जातात, आज फडणवीस, मोदी आहेत तर ते तिथे आहेत. उद्या महाविकास आघाडी, उद्धव ठाकरे सत्तेत आले तर ते सगळे आमच्या दाराबाहेर रांग लावून उभे असतील,' असा टोला संजय राऊत यांनी लगावला.

# गोवंश तस्करी, महिलांची छेडछाड आणि वाढती गुन्हेगारी

तामसा : (स. गांवकरी)

- नव्या पीआयंसमोर आव्हानांचा डोंगर
- गुन्हेगारांवर धाक निर्माण होणार की पुन्हा 'जैसे थे' कारभार?
- हदगावकरांच्या नजरा नव्या पीआयंच्या कृतीकडे



हदगाव पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक (पीआय) परमेश्वर कदम यांच्यासमोर कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासह वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. हदगाव शहरासह तालुक्यात खून, चोरी, घरफोडी, जीवघेणे हल्ले, मारामाऱ्या, अवैध जुगार, अवैध दारू विक्री, महिलांची छेडछाड, कौटुंबिक अत्याचार, दादागिरी आणि विविध बेकायदेशीर प्रकारांबाबत सातत्याने चर्चा होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही वर्षांत घडलेल्या अनेक गंभीर घटनांमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित झाले होते. अनेकदा गुन्हा घडल्यानंतर कारवाई होत असली तरी गुन्हेगारीला प्रतिबंध घालण्यासाठी आवश्यक असलेली प्रभावी यंत्रणा अपेक्षित प्रमाणात दिसून आली नाही, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. त्यामुळे नव्याने रुजू झालेल्या पीआय परमेश्वर कदम यांच्याकडून केवळ कागदोपत्री कारभार नव्हे, तर प्रत्यक्ष मैदानात उतरून कठोर आणि परिणामकारक पोलिसिंगची अपेक्षा व्यक्त होत आहे. विशेषतः हदगाव शहर आणि ग्रामीण भागात सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांवर पोलिसांचा वचक निर्माण होणार का, हा चर्चेचा विषय ठरला आहे. अवैध जुगार अड्डे, अवैध दारू विक्री, चोरीच्या घटना, समाजकंटकांची वाढती दादागिरी आणि कायद्याचा धाक कमी होत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी पुढे येत असतात. या सर्व प्रकारांवर कठोर कारवाई करून गुन्हेगारांना कायद्याची भीती दाखविण्यात नवे पीआय यशस्वी ठरणार का, याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. याशिवाय काही भागांत अवैध गोवंश वाहतूक आणि गोवंश हत्येबाबतही सातत्याने चर्चा व तक्रारी समोर येत असतात. या प्रकारांना आळा घालण्यासाठी विशेष मोहीम राबविली जाणार का, तसेच संबंधितांवर कठोर कारवाई होणार का, याबाबतही नागरिकांमध्ये उत्सुकता आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनत चालला असून महिलांना होणारी छेडछाड, अत्याचार आणि कौटुंबिक वादांच्या वाढत्या घटनांमुळे पोलिसांनी अधिक संवेदनशील आणि प्रभावी भूमिका घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे. गावपातळीवरील वाद, गटबाजी, जमिनीचे प्रश्न आणि त्यातून उद्भवणारे तणाव रोखण्यासाठीही पोलिसांनी अधिक सक्रिय होण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, सर्वसामान्य नागरिकांमधून एकच सवाल विचारला जात आहे — यापूर्वीचे अधिकारी ज्या पद्धतीने पोलीस ठाण्याचा कारभार सांभाळत होते, त्याच पद्धतीने नव्या पीआयंचा कारभार चालणार आहे का, की हदगावमधील गुन्हेगारी, अवैध धंदे आणि समाजकंटकांविरोधात धडक मोहीम उघडून कायद्याचे राज्य प्रस्थापित केले जाणार आहे? हदगावकरांना आता आश्वासनांपेक्षा कृती हवी आहे. अवैध धंदे बंद झालेले दिसावेत, चोरीच्या घटनांवर नियंत्रण यावे, महिलांना सुरक्षित वातावरण मिळावे, गोवंश तस्करीला आळा बसावा आणि गुन्हेगारांच्या मनात पोलिसांचा धाक निर्माण व्हावा, अशी जनतेची अपेक्षा आहे. पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासाठी ही केवळ नवीन नियुक्ती नसून हदगावच्या जनतेचा विश्वास परत मिळविण्याची मोठी जबाबदारी आहे. गुन्हेगारांच्या मनात भीती आणि सर्वसामान्य नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करण्यातच त्यांच्या कार्यकाळाचे खरे यश दडलेले असेल. आता हदगावकरांच्या नजरा शब्दांवर नाहीत, तर नव्या पीआयंच्या कृतीवर खिळल्या आहेत.

## पावसातच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची घाई

डांग : गुजरात : (स. गांवकरी)



डांग जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ सापुतारा आणि परिसरात आज पहाटेपासूनच जोरदार वारे, मिनी वादळ आणि पावसाच्या सरींनी हजेरी लावली आहे. अशा परिस्थितीत नेशनल हायवे ओथोरिटी ऑफ इंडिया च्या कामकाजाबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. एकीकडे सापुतारा परिसरात मुसळधार पाऊस सुरू असताना दुसरीकडे सापुतारा–शामगव्हाण राष्ट्रीय महामार्गावर प्री-मॉन्सून अंतर्गत खड्डे बुजविण्याचे आणि डागडुजीचे काम सुरू करण्यात आले आहे. आहवा ते सापुतारा हा संपूर्ण राष्ट्रीय महामार्ग अनेक महिन्यांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून अपघाताचा धोका देखील वाढला आहे. प्रत्यक्षात पावसाळा सुरू होण्यापूर्वीच ही दुरुस्ती पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, आता पावसाला सुरुवात झाल्यानंतर घाईघाईने पॅचवर्क करण्यात येत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. सध्या सुरू असलेल्या पावसात रस्त्यावर टाकण्यात येणारे हे डांबरी पॅच किती दिवस टिकतील, असा प्रश्न स्थानिक नागरिक आणि वाहनचालक उपस्थित करत आहेत. पावसाच्या पहिल्याच फेरीत कोट्यवधी रुपयांच्या खर्चातून करण्यात येणारे हे काम वाहून जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## शेतकऱ्यांचा एल्गार; गाढवांसह तहसीलवर धडक

### "आमच्यासारखे वागू नका" असे गाढवांवर लिहीत सरकारच्या धोरणांचा निषेध

मुदखेड : (स. गांवकरी)



मुदखेड तालुक्यातील शेतकरी प्रश्नांनी गंभीर स्वरूप धारण केल्याच्या पार्श्वभूमीवर आज तहसील कार्यालयावर शेकडो शेतकऱ्यांचा भव्य एल्गार मोर्चा धडकला. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ता तथा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाडे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात जिल्ह्याचे खासदार रविंद्र चव्हाण, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, कार्याध्यक्ष तिरुपती कोंढेकर आणि शेतकरी नेते भगवान पाटील मनुरकर यांनी सहभाग नोंदवला. यावेळी खासदार रविंद्र चव्हाण यांनी भाजप सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर जोरदार टीका करत सरकारने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केलेल्या दुर्लक्षाचा निषेध केला. मुदखेड तालुक्यात मागील काही काळापासून डिझेल टंचाई, खत व बियाण्यांचा तुटवडा, युरिया खताचे सक्तीचे लिंकिंग, पीक विमा मंजुरीतील अडथळे, पीक कर्जातील समस्या आणि वाढत्या महागाईमुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडला आहे. वारंवार निवेदने, पाठपुरावा आणि आंदोलन करूनही प्रश्न कायम असल्याने अखेर शेतकऱ्यांनी संतप्त एल्गार पुकारला. या मोर्च्याचे विशेष लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणजे आंदोलनात प्रतीकात्मक स्वरूपात आणण्यात आलेली गाढवे होती. गाढवांवर "आमच्यासारखे वागू नका" असे फलक लावून सरकारच्या धोरणांवर आणि प्रशासनाच्या असंवेदनशील भूमिकेवर तीव्र प्रहार करण्यात आला. शेतकऱ्यांशी होत असलेल्या दुर्लक्षाचा आणि अन्यायकारक वागणुकीचा हा प्रतीकात्मक निषेध असल्याचे आंदोलकांनी सांगितले. तहसील कार्यालय परिसर घोषणांनी दणाणून गेला. "डिझेल टंचाई हटवा", "खत लिंकिंग बंद करा", "पीक विमा मंजूर करा", "शेतकऱ्यांना न्याय द्या" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी माजी नगरसेवक गोविंद दादा गोपणपल्ले, गंगाधर डांगे, करीम खासाब, नगरसेवक तथा शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, अविनाश चौदंते, खदिर भाई, संजय बोकेफोड, जिल्हा सरचिटणीस गिरीश कोत्तावार, सूर्यकांत चौदंते, सुभाष चौदंते, वेदांत शेवटे, शेख गौस भाई फुलवाले, खदिर खुरेशी, मोईन भाई फुलवाले, श्याम शिंदे, केशव शिंदे, विश्वनाथ पवार, शिवाजी वडजे, माणिक मुंगल, संभाजी गाडे, गणेश ढगे, यदुराज गाडे, विठ्ठल आचार्य, संभाजी पवार, प्रशांत मुंगल, नागोराव भांगे, हनुमान लखे, माधव अक्केमवाड, प्रल्हाद राहेरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

> मोर्चानंतर तहसीलदारांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शेतकरी प्रश्नांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा बालाजी गाडे पाटील यांनी दिला.
>
> **- बालाजी गाडे पाटील**
> **प्रवक्ता, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी**
> **अध्यक्ष, युवक काँग्रेस नांदेड**

## दिवा शहरातील नालेसफाईच्या कामांची पोलखोल

दिवा : (स. गांवकरी)



महाराष्ट्र नवनिर्माण सेना दिवा शहराचे शहराध्यक्ष श्री. तुषार भास्कर पाटील यांनी दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना निवेदन देऊन दिवा शहरात सुरू असलेल्या नालेसफाईच्या कामांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दरवर्षीप्रमाणे यंदाही ३१ मे पूर्वी नालेसफाईची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र, पावसाळा तोंडावर असताना देखील कामांचा वेग अत्यंत संथ असल्याचे दिसून येत आहे. परिणामी अल्प पावसातही शहरातील अनेक भागांमध्ये पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळेल असे मनसेने आपल्या निवेदनात म्हटले आहे. यंदा नालेसफाईसाठी सुमारे १ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. एवढा मोठा खर्च करूनही कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने होत नसल्यास तो सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे. दिवा प्रभाग समिती मधील प्रभाग क्रमांक २७, २८ आणि २९ मध्ये मोठा गाजावाजा करत नालेसफाईच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. संबंधित नालेसफाईच्या कंत्राटदाराला सहाय्यक आयुक्तांसमोरच फोन केला असता कंत्राटदाराने २५० कामगार नालेसफाई साठी काम करत असल्याची माहिती दिली. पण काम कुठे सुरू आहे याची माहिती विचारातच कुठलेही समाधानकारक उत्तर कंत्राटदाराला देता आले नाही. ज्या स्वच्छता निरीक्षकांनी या सर्व कामावर देखरेख ठेवायला हवी त्या स्वच्छता निरीक्षक डोंगर परदेशी यांनाही नालेसफाई नेमकी कुठे सुरू आहेत तिथे किती कामगार काम करतात याची माहिती नव्हती. अशा पद्धतीने जर दिवा शहरात कमी होत असतील तर नालेसफाई कशा पद्धतीने होत असेल याचा विचार न केलेला बरा असे मनसेने आपल्या पत्रकात म्हटले आहे.

ठाणे महापालिकेने ८०% नालेसफाई झाल्याचा दावा केलेला असताना दिव्यात मात्र सगळा सावळागोंधळ दिसून येत आहे. दिव्यात सध्या २०% ते २५% नालेसफाई झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे यावर्षी पुन्हा नागरिकांच्या घरात पाणी शिरल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांना मनसे स्टाईल धडा शिकवू असा इशारा दिवा मनसेने दिला आहे. प्रसंगी दिवा शहराध्यक्ष तुषार भास्कर पाटील, शहर सचिव प्रशांत प्रभाकर गावडे, विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील, शरद पाटील, संतोष पाटील,उपविभाग अध्यक्ष, शाखा अध्यक्ष, महिला पदाधिकारी आणि महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## १२ वर्षीय देवेंद्रच्या मृत्यूप्रकरणी चौकशीची मागणी

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरातील १२ वर्षीय कु. देवेंद्र आशिष सिंग यांच्या मृत्यूप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच दिवा शहरातील बोगस डॉक्टर, अनधिकृत क्लिनिक आणि परवान्याविना चालणाऱ्या मेडिकल व्यवसायांवर विशेष मोहीम राबवून कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल धनराज केंद्रे यांनी प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात ठाणे पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी, मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन (FDA) यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनानुसार, कु. देवेंद्र आशिष सिंग यांना डॉक्टर कडून औषध देण्यात आले होते. औषध घेतल्यानंतर काही मिनिटांतच त्यांची प्रकृती गंभीर झाली. ते बेशुद्ध पडले तसेच त्यांचे हात-पाय वाकडे झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर त्यांना उपचारासाठी डोंबिवली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती अधिक गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी मुंबईतील केईएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र सात दिवस कोमात राहिल्यानंतर १ जून २०२६ रोजी उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. प्रकरणी वैद्यकीय निष्काळजीपणा अथवा अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाचा संशय व्यक्त करण्यात आला असून संबंधित मुलाला नेमके कोणते औषध देण्यात आले, ते कोणत्या मेडिकल स्टोअरमधून मिळविण्यात आले, औषध डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनवर देण्यात आले होते का, तसेच संबंधित व्यक्तीकडे वैद्यकीय व्यवसायासाठी आवश्यक पात्रता, नोंदणी आणि परवाने आहेत का याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# एसएमबीटी 'कॉलेज ऑफ फार्मसी'त आधुनिक संशोधनासह १००% प्लेसमेंटस

नंदी हिल्स : (स. गांवकरी)




संशोधन क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कामगिरी, जागतिक दर्जाचे शैक्षणिक कोलॅबोरेशन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या त्रिसूत्रीच्या जोरावर एसएमबीटी 'कॉलेज ऑफ फार्मसी'ने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या संशोधनासाठी वाव देत जागतिक पातळीवर एक्स्पोजर मिळवून देण्यासाठी हे महाविद्यालय एक प्रगत व्यासपीठ ठरले आहे. या महाविद्यालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कॅम्पसमध्येच उपलब्ध असलेले तब्बल १२०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय! यामुळे येथील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष रुग्ण सेवा आणि क्लिनिकल फार्मसीचा व्यावहारिक अनुभव मिळत आहे. उत्तम दर्जाच्या संशोधनासाठी महाविद्यालयात 'स्टेट ऑफ द आर्ट' रिसर्च लॅबोरेटरी आणि सोफिस्टिकेटेड ॲनालिटिकल इन्स्ट्रुमेंट्सची सुविधा आहे. या समृद्ध शैक्षणिक वातावरणामुळेच प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा अधिक रिसर्च पेपर्स प्रसिद्ध केले आहेत. यामध्ये फार्मसी विभागाच्या वतीने दरवर्षी तब्बल १०० ते १५० शोधनिबंध आंतरराष्ट्रीय स्तरावर नामांकित जर्नल्समध्ये प्रकाशित केले जातात. महाविद्यालयाच्या नावावर ५०० हून अधिक पब्लिकेशन्स, ७० पेक्षा अधिक स्कोपस (Scopus) आर्टिकल्स प्रसिद्ध झाले आहेत. विशेष म्हणजे चालू वर्षी २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी संशोधन कार्य पूर्ण केले आहे. संशोधन कार्यास वाव मिळावा म्हणून यावर्षी २० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध शोधनिबंध प्रसिद्ध करून पारितोषिके पटकावली आहेत. तसेच ३० हून अधिक पेटंट्सची नोंददेखील झाल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवण्यात यश आले आहे. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी गेल्या २० वर्षांपेक्षा अधिक काळ या महाविद्यालयाने हजारो विद्यार्थी घडवले आहेत. आज जगाच्या कानाकोपऱ्यात हे विद्यार्थी उल्लेखनीय कामगिरी करत असल्याचे विभागप्रमुख कुंदन तिवारी यांनी सांगितले.

ते म्हणाले, जगभरातील १० पेक्षा अधिक परदेशी संस्थांशी सामंजस्य करार (Foreign Collaborations) करण्यात आले आहेत. यात प्रामुख्याने थायलंड, युएई, मलेशिया, इंडोनेशिया, नेपाळ, श्रीलंका, फिलीपिन्स आणि व्हिएतनाम या देशांमधील ९ नामांकित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचा समावेश आहे. या करारांतर्गत विद्यार्थ्यांसाठी आंतरराष्ट्रीय स्टडी टूरचे आयोजन केले जाते. विशेष म्हणजे, या उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना आर्थिक हातभार आणि विशेष स्कॉलरशिप देखील दिली जाते. हे महाविद्यालय उच्च शिक्षणाचे एक अग्रगण्य केंद्र बनले असून येथे मान्यताप्राप्त पीएचडी (Ph.D.) सेंटर आहे.

महाविद्यालयातील १३ पेक्षा अधिक अनुभवी प्राध्यापक स्वतः पीएचडी धारक असून ते मार्गदर्शक (Guides) म्हणून कार्यरत आहेत. याशिवाय, विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'जीपॅट' (GPAT) आणि 'नायपर' (NIPER) या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षांची संपूर्ण तयारी महाविद्यालयातच करून घेतली जाते. विद्यार्थी केंद्रित शिक्षण (Student-Centric Education) देत असतानाच त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी सायको-सोशल सपोर्ट आणि शारीरिक स्वास्थ्यासाठी ट्रेनरसह हाय-क्वालिटी जिम, झुंबा, योगा आणि २४ तास स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची सुविधा उपलब्ध आहे. कॅम्पसमध्ये भव्य क्रिकेट ग्राउंड देखील आहे.

महाविद्यालयाचे हॉस्टेल सर्व सोयींनी युक्त असून, रात्रीच्या अभ्यासासाठी 'नाईट लायब्ररी'ची विशेष सुविधा आहे. ग्रंथालयात १० हजारांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. संपूर्ण कॅम्पस पर्यावरणपूरक, 'प्लास्टिक आणि व्हेईकल फ्री' असून अंतर्गत दळणवळणासाठी बॅटरी ऑपरेटेड बग्गी आणि सायकल फॅसिलिटी दिली आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक जाणीव देखील रुजवली जात असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो.

> **सक्षम संशोधक घडविण्यासाठी प्रयत्न**
>
> परदेशी विद्यापीठांसोबतच्या करारांमुळे आमच्या विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण पद्धती प्रत्यक्ष अनुभवता आली. हा अनुभव त्यांच्या करिअरला एक नवी आणि सक्षम दिशा देणारा ठरत आहे. आम्ही केवळ संशोधन करत नसून, जागतिक आव्हानांना तोंड देऊ शकतील असे सक्षम संशोधक घडवत आहोत.
>
> **- डॉ. योगेश उशीर, प्राचार्य, कॉलेज ऑफ फार्मसी**

# थोडक्यात पण महत्वाचे



## श्री संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरात आंब्यांची आकर्षक सजावट!

आळंदी (स. गांवकरी) : अधिकमासाच्या पवित्र पर्वानिमित्त संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधी मंदिरात आंब्यांच्या आकर्षक सजावटीने भक्तांचे लक्ष वेधून घेतले. मंदिर परिसरात विविध प्रकारच्या आंब्यांचा वापर करून करण्यात आलेली ही अनोखी सजावट भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरली. अधिकमासाला हिंदू धर्मात विशेष धार्मिक महत्त्व असून या काळात पूजा, जप, दानधर्म आणि भक्तीमय उपक्रमांना प्राधान्य दिले जाते. त्यानिमित्ताने मंदिर प्रशासनाने समाधी मंदिराचे सुशोभीकरण करत आंब्यांच्या फळांनी देखणी सजावट केली. सजावटीमुळे मंदिर परिसराला भक्तिमय आणि प्रसन्न वातावरण लाभले. सजावट पाहण्यासाठी आणि दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिरातील या अनोख्या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक होत असून अधिकमासाच्या निमित्ताने भक्ती आणि संस्कृतीचा सुंदर संगम अनुभवायला मिळत असल्याची भावना अनेक भाविकांनी व्यक्त केली.

## इन्स्टाग्रामवर बनावट खाते उघडून तरुणीची बदनामी

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सोशल मीडियाचा गैरवापर करून तरुणीची बदनामी करणाऱ्या आणि लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करणाऱ्या एका विकृताविरुद्ध अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने बनावट इन्स्टाग्राम खाते तयार करून या तरुणीला सातत्याने अलील आणि त्रासदायक संदेश पाठवले होते. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित २६ वर्षीय तरुणी कोळगाव परिसरातील रहिवासी असून ती अंतर्गत सजावटकार म्हणून काम करते. आरोपी मोबाईल क्रमांक धारकाने पीडितेच्या नावाने इन्स्टाग्राम सोशल मीडिया संकेतस्थळावर वेगवेगळी बनावट खाती उघडली. यामध्ये त्याने तरुणीची बदनामी करण्याच्या उद्देशाने बनावट ओळख तयार केली. या बनावट खात्यांच्या माध्यमातून आरोपीने पीडित तरुणीच्या अधिकृत इन्स्टाग्राम खात्यावर अलील, लज्जा उत्पन्न होईल असे संदेश पाठवले. हा प्रकार एप्रिल महिन्यामध्ये नऊ ते दहा दिवसांच्या कालावधीत सातत्याने सुरू होता. या त्रासाला कंटाळून अखेर पीडितेने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी संबंधित मोबाईल क्रमांक धारक आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस अंमलदार सविता खताळ करत आहेत.

## आ. सोनवणे वाजगे,पाटे यांच्या भेटीला



खोडद (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्याचे विकास पुरुष आपला माणूस आमदार शरद दादा सोनवणे आपले सहकारी जुन्नर शिवसेना तालुका प्रमुख बाबुभाऊ पाटे यांचे वडील ज्येष्ठ शिवसैनिक बाळासाहेब पाटे व नारायणगावचे माजी उपसरपंच व नारायणगाव शिवसेना शहराध्यक्ष संतोष दादा वाजगे यांची खाजगी मध्ये त्यांच्या घरी जाऊन आपुलकीने तब्येतीची विचारपूस त्यांना धीर देऊन लवकर बरे होण्यासाठी आपुलकीने धीर देण्याचे काम केले. नेहमीच आपल्या कार्यकर्त्यांविषयी आस्था असणारे व्यक्तिमत्व शिवसेना हा एक परिवार आहे त्याचे आपण पालकत्व म्हणून असलेली त्यांची तळमळ नेहमी दिसून येते.

## नारायणगावात उपबाजाराचे शेड उद्ध्वस्त



खोडद (स. गांवकरी) : नारायणगाव परिसरात मंगळवारी दुपारी २ वाजता गारा आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान केले. अवकाळी पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजारातील धना-मेथी विक्रीसाठी उभारलेले शेड कोसळले. या दुर्घटनेत सुमारे ३८ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पुणे-नाशिक महामार्गालगत १३ एकर जागेत धना-मेथी विक्रीसाठी हे शेड उभारण्यात आले होते. मंगळवारी दुपारी वादळी वाऱ्यासह अचानक झालेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण शेड कोसळले. या घटनेची माहिती मिळताच बाजार समितीचे पदाधिकारी व संचालकांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. अवकाळी पावसात मार्केट शेड पडल्यानंतर सदर शेडच्या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. काही संचालकांनी या प्रकारच्या बांधकामाला सुरुवातीपासून विरोध दर्शविला होता. "वादळी वाऱ्यात शेड जमीनदोस्त" झाल्याने शेतकऱ्यांच्या घामाच्या पैशातून उभारलेल्या ३८ लाख रुपयांच्या प्रकल्पाचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या धना-मेथी मार्केटच्या भवितव्याबाबत आता प्रशासन कोणती पावले उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आम्ही विरोधक म्हणून नव्हे, तर शेतकऱ्यांच्या हितासाठी या कामावर आक्षेप घेतला होता,असे माऊली खंडागळे यांनी सांगितले.

## CBSE ची धुरा लोखंडे साहेबांकडे!

खोडद (स. गांवकरी) : आपल्या जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावचे श्री.अरुणशेठ सुदामगुरुजी वेठेकर यांचे भाचे आणि केंद्रीय गृह मंत्रालयात अतिरिक्त सचिव म्हणून कार्यरत असलेले श्री.प्रशांत सिताराम लोखंडे साहेब यांची केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (CBSE) च्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक उच्चपदाच्या निवडीसाठी मनापासून अभिनंदन आणि शुभेच्छा. नुकतेच CBSE च्या 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीतील तांत्रिक अडचणी व उत्तरपत्रिकांच्या अदलाबदलीसंबंधी घडलेल्या गंभीर घटनेनंतर केंद्र शासनाने या केंद्रीय शैक्षणिक संस्थेची महत्वाची जबाबदारी श्री.लोखंडे साहेबांकडे दिली आहे. केंद्रशासित प्रदेश केडरचे २००१ साली भारतीय प्रशासकीय सेवेत दाखल झालेल्या लोखंडे साहेबांनी त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीत सामान्य प्रशासनातील धोरणात्मक कामे यशस्वीपणे पार पाडली आहेत. एक जुन्नरकर म्हणून आम्हाला अभिमान आहे की अशी प्रतिभावंत व कर्तबगार व्यक्ती आपल्यापैकी आहे. लोखंडे साहेबांचा प्रदीर्घ प्रशासकीय अनुभव व नीतिमत्त्वामुळे CBSE मध्ये शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, शिस्त, सुव्यवस्था आणि तांत्रिक सुधारणांसाठी ते महत्त्वपूर्ण भूमिका बजावून त्यांच्या नेतृत्वाखाली आपल्या भारत देशाच्या शैक्षणिक व्यवस्थेत सुधारणा घडून, विद्यार्थ्यांसाठी अधिक पारदर्शक व विश्वासार्ह प्रक्रिया झाल्याशिवाय राहणार नाही, असा जुन्नरकरांना ठाम विश्वास आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर विश्वस्तांची व्यापक बैठक संपन्न

- प्रस्तावित मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा
- राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून तात्काळ रद्द करण्यात यावा- ॲड.विलास महाजन




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मंदिरांना शेकडो वर्षांपूर्वी समाजहित, धार्मिक परंपरा, नित्य पूजा-अर्चा, उत्सव, अन्नदान, धर्मशाळा, वेदपाठशाळा आणि सामाजिक उपक्रमांसाठी इनामी जमिनी देण्यात आल्या होत्या. या जमिनी केवळ मालमत्ता नसून हिंदू समाजाच्या श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक व्यवस्थेचा आधार आहेत.

प्रस्तावित कायद्यामुळे मंदिरांच्या आर्थिक स्रोतांवर गंभीर परिणाम होऊन अनेक धार्मिक आणि सामाजिक उपक्रम बंद पडण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा कायदा हिंदू देवस्थानांच्या बाबतीतच हस्तक्षेप करणारा असून धार्मिक समतेच्या तत्त्वालाही बाधा पोहोचवणारा आहे. महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेला "मंदिर इनामी जमीन हक्क निर्मूलन कायदा" हा राज्यातील हजारो प्राचीन देवस्थानांवर अन्याय व आघात करणारा असून हिंदू धार्मिक संस्थांच्या स्वायत्ततेवर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा संपूर्णतः रद्द करून नवीन तज्ञ समितीमार्फत व्यापक अभ्यासानंतर नवीन प्रारूप तयार करण्यात यावे,अशी ठाम मागणी महाराष्ट्रातील विविध देवस्थानांनी आणि विश्व हिंदू परिषदेतर्फे करण्यात येत आहे.असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषदेचे मंदिर,अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन यांनी केले आहे.

टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालयात अहिल्यानगर जिल्ह्यातील मंदिर,विश्वस्त, पुजारी यांच्या बैठकीचे आयोजन विश्व हिंदू परिषद मंदिर,अर्चक ,पुरोहित आयमाच्या वतीने करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खाकीदास बाबा मठ ट्रस्ट चे अध्यक्ष चंद्रकांत काबरा, अँड.श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज, विश्व हिंदू परिषदेचे मंदिर, अर्चक,पुरोहित संपर्क आयामाचे पुणे विभाग प्रमुख ॲड.विलास महाजन,श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त पंडितराव खरपुडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली.

महाजन पुढे म्हणाले,मंदिर एवं अर्चक पुरोहित संपर्क विभागाच्या वतीने पश्चिम महाराष्ट्र प्रांतात ठिकठिकाणी विविध देवस्थानच्या विश्वस्तांची एकत्र बैठक घेऊन सदर विषयी जागरण करण्याचे काम आज चालू आहे.त्यामध्ये प्रस्तावित कायद्याची माहिती आणि त्यामध्ये असणाऱ्या आवश्यक सुधारणा याबाबत चर्चा केली जाते.

सदर उपक्रमास मंदिरांच्या विश्वस्तांचाही उत्तम प्रतिसाद मिळत आहे त्यामुळे अधिकाधिक ठिकाणी सदर विषय पोहोचवणे व मंदिर विश्वस्तांच्या सह्यांचे निवेदन सरकारपर्यंत पोहोचवणे यासाठी परिषद पुढील काळात अधिक क्रियाशील राहणार आहे.या बैठकीत अँड.श्रीराम भारदे, ह भ प रामदास क्षीरसागर महाराज यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात श्रीकांत नांदापूरकर म्हणाले,मंदिरांच्या मालमत्ता,परंपरा आणि धार्मिक स्वायत्ततेचे संरक्षण करणारी स्पष्ट तरतूद करण्यात यावी.कोणताही निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान, अर्चक, पुजारी आणि हिंदू समाजाशी व्यापक चर्चा करण्यात यावी.हिंदू समाजाच्या भावना लक्षात घेऊन हा प्रस्तावित कायदा आपले हिंदुत्ववादी सरकार मागे घेईल,असा आम्हाला विश्वास आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजेंद्र सोनवणे यांनी केले तर आभार अँड.जयदिप देशपांडे यांनी मानले. या बैठकीसाठी जिल्हातील मंदिर विश्वस्त पुजारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विश्व हिंदू परिषद मंदिर आर्चक पुरोहित आयामाचे प्रांत टोळी सदस्य अँड.जयदीप देशपांडे,विभाग टोळी सदस्य मिलिंद मोभारकर,गजेंद्र सोनवणे,हरिभाऊ डोळसे,विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्ध प्रमुख अमोल भांबरकर, मनोहर भाकरे,अरुण खिची,दिनेश परदेशी, अंबादास गोटीपामूल आदींनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर विधानपरिषद निवडणुक; उमेदवारांची संपत्ती जाहीर

अहिल्यानगर: (स. गांवकरी)

विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील अपक्ष उमेदवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे दत्तात्रय पानसरे हे १७ कोटी ६ लाख ३७ हजार रुपयांच्या जंगम-स्थावर मालमत्तेसह सर्वात श्रीमंत उमेदवार ठरले आहेत. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांची एकूण मालमत्ता १५ कोटी ३४ लाख रुपये असून ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. भाजपचे प्राजक्त तनपुरे तसेच अपक्ष उमेदवार करण ससाणे, दत्तात्रय पानसरे, कमलेश गांधी व मच्छिंद्र धुमाळ यांनी उमेदवारी अर्जासोबत संपत्तीचे विवरणपत्र निवडणूक आयोगाला सादर केले आहे. दत्तात्रय पानसरे व पत्नी अर्चना पानसरे यांच्याकडे ९ कोटी १८ लाखांची जंगम तर ७ कोटी ८८ लाखांची स्थावर मालमत्ता आहे. विशेष म्हणजे एकूण संपत्तीपैकी जवळपास १३ कोटींची मालमत्ता पत्नी अर्चना यांच्या नावे आहे. पत्नीच्या नावे ५७ लाखांच्या दोन चारचाकी, केडगाव येथे हॉटेल, तसेच घारगाव, घोटवी, बेलवंडी, केडगाव येथे शेतजमीन व सावेडी, चाहुराण्यात निवासी इमारती आहेत. पानसरे यांच्याकडे ८५ ग्रॅम तर पत्नींकडे ९० ग्रॅम सोने आहे. या कुटुंबावर ३ कोटी ६९ लाखांचे कर्ज आहे.

प्राजक्त तनपुरे व पत्नी सोनाली यांची एकूण मालमत्ता १५ कोटी ३५ लाख रुपये आहे. यात लोहगाव, पुणे येथील ५ कोटी ३० लाखांचे दोन फ्लॅट, वांबोरीत ३ कोटी २१ लाखांची ३०६ चौ.मी. जमीन, २०० ग्रॅम सोने व १० लाखांची ज्वेलरी यांचा समावेश आहे. प्राजक्त शुगर व प्राजक्त टेक्स्टाइलमध्ये ९३ लाखांचे शेअर्स आहेत. तनपुरेंना ९.३३ एकर तर पत्नीला माहेरून ६.५ एकर वारसा जमीन मिळाली आहे. विशेष म्हणजे या कुटुंबाच्या नावे एकही चारचाकी वाहन नाही. कुटुंबावर ६ कोटी ६३ लाखांचे कर्ज आहे.

# कोळी समाजाचे जात वैधता प्रमाणपत्र सुभतेने मिळावे

रावेर : (स. गांवकरी)



महाराष्ट्रातील कोळी जमातीतील अनुसूचित जमातीच्या बांधवांना जात वैधता प्रमाणपत्र सुलभतेने मिळण्याबाबत आदिवासी कोळी जमातीच्या कोळी महासंघासह अनेक संघटनांनी केलेल्या आंदोलन निवेदने मागणीचा आणि सातत्य पूर्ण पाठपुरावा केल्यानंतर महाराष्ट्र शासनाचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी सह्याद्री अतिथी गृहावर झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असल्याची बाब आज कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी आमदार रमेशदादा पाटील यांनी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना स्मरणपत्र सादर करून या संदर्भात तातडीने परिपत्रक काढण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अनुसूचित जमातीतील बांधवांचे जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्र सुलभरीत्या मिळण्यासाठी तसेच रक्तनात्यातील समाजबांधवांना जात वैधता प्रमाणपत्र सुलभतेने देण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. मात्र त्यानंतर झालेल्या लोकसभा, विधानसभा, महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगरपरिषद व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आचारसंहिते मुळे या निर्णयाच्या अंमलबजावणीस विलंब झाला. परिणामी कोळी समाजातील हजारो विद्यार्थी, युवक-युवती आणि शासकीय सेवांसाठी अर्ज करणारे उमेदवार अडचणीत आले आहेत. स्मरणपत्रात नमूद करण्यात आले आहे की, कोळी समाजाने विविध निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्ष व मित्रपक्षांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला असून समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. कोळी महासंघानेही या विषयावर सातत्याने पाठपुरावा केला असून मुख्यमंत्री यांनी २० ऑक्टोबर २०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संबंधित विभागाला त्वरित परिपत्रक जारी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. या वेळी कोळी महासंघ राष्ट्रीय अध्यक्ष रमेश दादा पाटील कार्याध्यक्ष प्रकाश बोबडी सरचिटणीस राजहंस टपके युवा अध्यक्ष अॅड.चेतन पाटील यांच्यासह विदर्भातून प्रा. सुरेश पाटकर, खान्देशचे प्रतिनिधी म्हणून जितेंद्र सपकाळे, पश्चिम महाराष्ट्र प्रतिनिधी पोपटराव पुजारी , मराठवाड्यातून सतिष धडे , जळगाव वरून प्रल्हाद सोनवणे , जितु दादा कोळी , महासंघाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांचा प्रकाशोत्सव

इगतपुरी : (स. गांवकरी)



नाशिक शहरापासून अवघ्या 70 किलोमीटर अंतरावर असलेल्या भंडारदरा येथील कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात काजव्यांचा प्रकाशोत्सव रंगात आला असून दोन दिवसांपूर्वी विजांच्या कडकडाटात पडलेल्या वळव्याच्या पावसाने दमदार हजेरी लावल्यानंतर काजव्यांच्या लखलखाटात अभयारण्यातील वृक्षराजीवर अधिकच वाढला आहे निसर्गाचा सृष्टी वरील हा अद्भुत नजारा डोळ्यात साठविण्यासाठी पर्यटकांची पावले मोठ्या संख्येने अभयारण्याकडे वळू लागली आहेत कठोर नियमावली आणि प्रभावी अंमलबजावणीमुळे यंदा नाशिक वन्यजीव विभागाने पर्यटकांना शिस्त लावण्यास बऱ्यापैकी यश मिळविले आहे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मागील वर्षी वन्यजीव विभागाला काजव्यांच्या उत्पत्ती काळात अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांना नियमांची कठोर चौकट आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची ताकद दिली होती यानुसार वन्यजीव विभागाने यावर्षी अभयारण्यात दोन्ही प्रवेशद्वारावरून सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत प्रवेशाची वेळ मर्यादा निश्चित केली आहे या वेळेत केवळ दोन हजार पर्यटकांना आत मध्ये सोडण्यात येत आहे प्रत्येक पर्यटकांचा आधार कार्डचा फोटो वाहन क्रमांक पर्यटक संख्या नोंदवून घेतली जात आहे मोबाईल टॉर्च बॅटरी कॅमेऱ्याच्या फ्लॅशचा वापरावर तसेच लहान मुलांच्या लाईटच्या शूज वर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे अभयारण्यात येणाऱ्या पर्यटकांनी वनविभागाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करत पर्यावरण स्नेही इको टुरिझम चा आनंद घ्यावा असे आवाहन अभयारण्याचे सहाय्यक वन संरक्षक अनिल पवार यांनी केले आहे पर्यावरण स्नेही इको टुरिझम चा भागवा. अति संवेदनशील जैवविविधता या भागात आहे का जवा अल्पायुषी कीटक या जैवविविधतेचा महत्त्वाचा घटक आहे काजव्याचा हा प्रजनन काळ असतो नर काजवा लुकलुकत मादीला स्वतःकडे आकर्षक करत एक प्रकारे संवाद साधत असतो आपल्या गोंगाट गोंधळ व कल्लोळामुळे त्याचा हा संवाद तुटून नरकाजवा मृत्युमुखी पडू शकतो बे जबाबदार वर्तन टाळावे कृत्रिम प्रकाश साहित्याचा कुठलाही वापर अभयारण्य क्षेत्रात करू नये असे आव्हान वन्य जीव विभागासह निसर्गप्रेमी पर्यावरण अभ्यासकांकडून करण्यात आले आहे हरिचंद्र गडाच्या पायथ्यालाही चमचम राजूर वनपरिक्षेत्राच्या येथील हरिचंद्र गडाच्या पायथ्याशी असलेल्या फोप संडी पाच नई कुमशेत या गावांमधील वृक्ष राजे वर सुद्धा काजव्यांची चमचम पहावयास मिळत आहे.

या ठिकाणीही वन्यजीव विभागाने रात्रीची गस्त वाढविली आहे सायंकाळी सहा ते रात्री नऊ या निश्चित केलेल्या कालावधीत पर्यटक या भागात सुद्धा जाऊन नियमांचे पालन करत काजवे बघू शकतात रोजगार निर्मितीला चालना काजवे बघण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे या भागात रोजगार निर्मितीला चालना मिळाली आहे

# कार शोरूमची ४१ लाख रूपयांची फसवणूक

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

बनावट यूटीआर क्रमांक व एडिट केलेले ऑनलाइन पेमेंटचे स्क्रीनशॉट पाठवून शहरातील महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज प्रा. लि. या मारूती सुझुकीच्या अधिकृत डिलरची तब्बल ४१ लाख रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शोरूमचे अकाउंटंट शुभम संजय शिंदे (रा. सदर बाजार, भिंगार) यांनी सोमवारी (१ जून) फिर्याद दिली आहे. त्यानुसार पवन गुरूनाथ पांडव (रा. निर्मलनगर, डोकेनगर शाळेसमोर, सावेडी) आणि संतोष त्रिंबक दळवी (रा. भगवान निवास, निर्मलनगर, सावेडी) यांच्याविरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष दळवी याने ३ जानेवारी २०२६ रोजी महालक्ष्मी ऑटोमोटिव्हज शोरूममधून पाच चारचाकी वाहने खरेदी केली होती. या वाहनांच्या मोबदल्यात पवन पांडव याने स्वतःच्या नावाचा ४१ लाख रूपयांचा धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश अपुऱ्या शिल्लक रकमेमुळे बाऊन्स झाला. त्यानंतर संबंधितांनी वारंवार पैसे देण्याचे आश्वासन दिले. ४ एप्रिल रोजी दुसरा धनादेश दिला गेला; मात्र तोही बाऊन्स झाला. पैसे अदा करण्याऐवजी संशयित आरोपींनी शोरूमच्या व्यवस्थापनाला बनावट यूटीआर क्रमांक आणि एडिट केलेले ऑनलाइन व्यवहारांचे स्क्रीनशॉट पाठवून रक्कम जमा झाल्याचा आभास निर्माण केला. संशयित आरोपी पवन पांडव याने शोरूमचे मुख्य व्यवस्थापक सचिन चांदणे तसेच फिर्यादी शुभम शिंदे यांच्या व्हॉट्सअॅपवर विविध यूटीआर क्रमांकांचे स्क्रीनशॉट पाठवून पैसे खात्यात जमा झाल्याचे सांगितले.

# जलसंपदा कार्यालयांच्या स्थलांतराच्या निर्णयावर उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

## शेतकरी, लोकप्रतिनिधींकडून निर्णयाचे स्वागत

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या कार्यालय स्थलांतराच्या निर्णयाविरोधात छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली याचिका फेटाळण्यात आली असून, जलसंपदा विभागाच्या धोरणात्मक निर्णयावर उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कृष्णा व गोदावरी पाटबंधारे महामंडळाने प्रदेश, मंडळ आणि विभाग स्तरावरील कार्यालयांच्या पुनर्रचनेचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला होता. सिंचन प्रशासन गतिमान आणि लोकाभिमुख व्हावे, तसेच या निर्णयाचा लाभ शेतकरी, नागरिक आणि लोकप्रतिनिधींना व्हावा, हीच यामागची भूमिका होती. सिंचनविषयक कामांसाठी लोकप्रतिनिधी, शेतकरी व नागरिकांना कार्यालये जवळ तसेच धरण लाभक्षेत्रात असावीत, या उद्देशाने महामंडळाच्या २७ मे २०२६ रोजीच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. मात्र, जलसंपदा विभागाच्या निर्णयाविरोधात रौफ नवजा पटेल यांनी संभाजीनगर उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी होऊन न्यायालयाने सदर याचिका खारीज केली आहे.

न्यायालयाच्या सुनावणीदरम्यान माननीय न्यायालयाने पक्षकाराला "सदरचे काम हे प्रशासकीय आहे, मात्र समाजमाध्यमांतून प्रसारित झालेली कागदपत्रे घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली आहे", असे म्हटले. तसेच सदरचे प्रकरण दाखल करताना पक्षकाराने कोणताही अभ्यास किंवा कागदपत्रांचे संशोधन केलेले नाही, असे अभिप्राय नोंदवले. याचसोबत, "विभागाच्या मंत्र्यांना प्रतिवादी का केले?" असा प्रश्नही केला. सदर याचिकेचे कामकाज चालू ठेवण्यासाठी २० लाख रुपये भरावे किंवा याचिका मागे घ्यावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आणि यासाठी १५ मिनिटांचा कालावधी दिला होता. त्यावर पक्षकाराने याचिका मागे घेत असल्याचे न्यायालयासमोर सांगितले.

कार्यालय स्थलांतर करण्याचा महामंडळाचा निर्णय असून, राज्यातील नदीजोड प्रकल्पाच्या पूर्णत्वासाठी तसेच जलसंपदा विभागाच्या योजनांच्या व निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी घेतलेला हा धोरणात्मक निर्णय असल्याचे निरीक्षण न्यायालयाने याचिका फेटाळताना नोंदवले. राज्य सरकारच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ जी. पी. गिरासे, गोदावरी पाटबंधारे महामंडळाच्या वतीने सीनियर कौन्सिल विनायक होन आणि विधिज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली. महामंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या निर्णयाची अंमलबजावणी १ जूनपासून सुरू झाली आहे. अनेक वरिष्ठ अधिकारी त्यांच्या नेमणुकीच्या कार्यालयांत हजर झाले. मात्र, तृतीय व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनांच्या वतीने विभागाच्या निर्णयाविरोधात आंदोलने सुरू करण्यात आली होती. आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणे क्रमप्राप्त होणार आहे. दीर्घकाळापासून जलसंपदा विभागाचे निर्णय धरण लाभक्षेत्रापासून दूरवर असलेल्या कार्यालयांतून होत होते. लाभक्षेत्रातील लोकप्रतिनिधी, शेतकरी, अभियंते आणि कर्मचारी यांनाही कामकाजाकरिता अनेक जिल्ह्यांचा प्रवास करून जावे लागत होते. निर्णय आणि अंमलबजावणी यामध्ये लागणारा विलंब कमी करण्यासाठी जलसंपदा विभागाने कार्यालय स्थलांतराचा निर्णय घेतला आहे. नैसर्गिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर क्षेत्रीय स्तरावर सक्षम प्रशासन उभे करण्याच्या दृष्टीने जलसंपदा विभागाचा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे. आजच्या न्यायालयाच्या निर्णयामुळे आता त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे कार्य हीच आमची प्रेरणा - धोंडीभाऊ दातीर

## कासारे येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव उत्साहात साजरी; 'होम मिनिस्टर' खेळाने वेधले लक्ष

पारनेर : (स. गांवकरी)



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे कार्य हे केवळ आदर्श नसून आम्हा सर्वांसाठी अखंड प्रेरणा आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या उत्सवामुळे गावात एकीची भावना अधिक दृढ झाली आहे. विशेषतः महिलांसाठी आयोजित 'होम मिनिस्टर' स्पर्धेमुळे गावात आनंदाचे आणि चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. अशा उपक्रमांमधूनच आपल्या संस्कृतीचे जतन होते आणि गावातील सामाजिक सलोखा अधिक वृद्धिंगत होतो, हे पाहून खूप समाधान वाटले. असे मत माजी सरपंच धोंडीभाऊ दातीर यांनी व्यक्त केले.

कासारे येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित सार्वजनिक जयंती उत्सव मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला. महोत्सवाचे हे ५ वे वर्ष असून, यानिमित्त आयोजित विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी गावकऱ्यांचा व परिसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ४ :३० वाजता अहिल्यादेवींच्या प्रतिमेच्या भव्य मिरवणुकीने झाली. त्यानंतर सायंकाळी ६:०० वाजता दीपप्रज्वलन व महाआरती पार पडली. यानंतर स्वागत गीत आणि सेवापूर्ती सत्कार समारंभ सोहळा पार पडला.

महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेला प्रा. निलेश पडवळ प्रस्तुत महिलांसाठीचा 'लै भारी होममिनिस्टर खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम सायंकाळी ७:०० ते रात्री १०:०० या वेळेत रंगला. या रंगतदार स्पर्धेत इंदुबाई दातीर (प्रथम), सविता पोंदे (द्वितीय) आणि पुष्पा रावते (तृतीय) यांनी बाजी मारली. विजेत्या महिलांना अनुक्रमे कलर टी.व्ही., रेफ्रिजरेटर आणि शिलाई मशीनसोबत मानाची पैठणी देऊन गौरवण्यात आले. हे बक्षिस प्रायोजक म्हणून अनुक्रमे श्री. बाळासाहेब दातीर (चाकण), श्री. संपत दातीर व श्री. संतोष दातीर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानदेव दातीर होते. या प्रसंगी माजी सरपंच धोंडीभाऊ दातीर, सरपंच शिवाजी निमसे, लहू खरात, मंजाराम दातीर, पप्पू कासुटे, सामाजिक कार्यकर्ते वसंत दातीर, ज्ञानदेव दातीर , बाळासाहेब दातीर, भाऊ कासुटे, गणेश दातीर, संपत दातीर, उत्तम दातीर, बाळासाहेब दातीर, दादाभाऊ कासुटे, संतोष साळवे (सर), रामदास शिंदे (सर), केतन दातीर, संतोष दातीर, बबन दातीर, रोहिदास नरड, अजित निमसे आणि चौरे सर उपस्थित होते.

रात्री १०:०० वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचे अन्नदाते म्हणून दादाभाऊ कासुटे, संतोष साळवे (सर ), रामदास शिंदे (सर) आणि उत्तम दातीर यांनी जबाबदारी स्वीकारली होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष दातीर व केतन दातीर यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी समस्त ग्रामस्थ व मुंबई, पुणे, नगर येथील कासारेकरांनी मोलाचे योगदान दिले.

### लोककल्याण आणि संस्कृती संवर्धनाचे एक पवित्र मिशन

कासारे येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे कार्य हे केवळ एक संस्था म्हणून मर्यादित नसून, ते लोककल्याण आणि संस्कृती संवर्धनाचे एक पवित्र मिशन आहे. अहिल्यादेवींच्या विचारांचा वारसा जोपासत, सामाजिक एकोपा आणि महिला सक्षमीकरणासाठी प्रतिष्ठानने आखलेले उपक्रम अत्यंत स्तुत्य आहेत. अशा उपक्रमांमुळेच ग्रामीण भागातील कला आणि कर्तृत्वाला व्यासपीठ मिळते. संस्थेच्या या कार्यामुळे समाजाला एक नवी दिशा आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा सातत्याने मिळत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## हिंदू संस्कृतीचा प्रचार करणे हे सर्वांचेच कर्तव्य - चारुदत्त आफळे




पुणे (स. गांवकरी) : गजवा ए हिंद करण्यासाठी अनेक लोक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे काम करत आहेत. या देशात हिंदू जिवंतच राहू नयेत यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ही मानसिकता हाणून पाडण्यासाठी प्रत्येकाने हिंदू संस्कृतीचा आपापल्या परीने प्रचार आणि प्रसार करणे गरजेचे आहे नव्हे तर ती काळाची गरज बनली आहे. हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे आपले कर्तव्यच आहे असे मत जेष्ठ राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांनी व्यक्त केले. नागरिक सोशल फाउंडेशन तर्फे प्रियकर हिंदुस्थान या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमाला मध्ये चारुदत्त आफळे बोलत होते. यावेळी वक्ता विभाग प्रमुख दीपक मेहंदळे, संचालक अमेय सप्रे ,प्रीतम थोरवे, शेखर यादव आदी यावेळी उपस्थित होते. चारुदत्त आफळे म्हणाले, हिंदू किंवा हिंदुस्थान हे शब्द उच्चारताना आपल्याला संकोचल्यासारखे वाटावे अशी आज परिस्थिती निर्माण झाली आहे. इतर संस्कृती किंवा देश आपले नाव उच्चारताना अभिमानाची भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होते परंतु आपल्याला मात्र संकोचल्यासारखे होते ही केवळ आपल्यासाठीच नव्हे तर हिंदू संस्कृतीसाठी धोकादायक बाब आहे. त्यामुळे हिंदू संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे ही भावना आपण मनामनामध्ये रुजवली पाहिजे असे आवाहन चारुदत्त आफळे यांनी यावेळी केले. स्वातंत्र्यानंतर शिक्षण व्यवस्थेवर चुकीच्या शक्तींचा पगडा असल्यामुळे केवळ इंग्रजीचे लांगुलचालन आणि पाश्चात्य संस्कृतीचे उदात्तीकरण अशा प्रकारे हिंदू संस्कृतीला कमी लेखण्याचा प्रकार प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे होत आला आहे. परंतु आता जेव्हा गजवा ए हिंद करण्यासाठी शक्ती एकवटल्या असताना हिंदूंनीही आपली वज्रमूठ बळकट करणे गरजेचे आहे तरच खऱ्या अर्थाने आपण स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वप्नातील अखंड भारत निर्माण करू शकू असा विश्वास चारुदत्त आफळे यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमेय सप्रे यांनी केले. मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर प्रीतम थोरवे यांनी आभार मानले.

## आळेफाटा रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी राजेंद्र जाधव

खोडद (स. गांवकरी) : सामाजिक कार्यासाठी प्रसिद्ध असलेल्या रोटरी इंटरनॅशनलच्या रोटरी क्लब ऑफ आळेफाटा-मेनच्या २०२५-२६ वर्षासाठी नवीन कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यामध्ये रो. राजेंद्र जाधव यांची अध्यक्षपदी तर रो. शुभम ढमाले यांची सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात आली. रोटरी इंटरनॅशनलच्या 'Create Lasting Impact' या संकल्पनेनुसार शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकास क्षेत्रात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. समाजावर दीर्घकालीन आणि सकारात्मक परिणाम घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल विविध सदस्यांनी शुभेच्छा दिल्या.त्यामध्ये अक्षय मंडलिक, मोहन जाधव,विकास मटाले, डॉ.प्रदीप गुंजाळ, डॉ.महादेव वाणी, ऋषी पोळ, गौरव बनकर, डॉ. अमोल डुंबरे,शिवाजी गोरे, जीवनभाऊ शिंदे, हरिषचंद्र वाघुले, सचिन डुंबरे, रोशन घुले, ॲड.अमित कुटे यांनी शुभेच्छा दिल्या.आगामी काळात क्लबच्या सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

## एक आरोपी अटक व पाच फरारी

शिवनेरी (स. गांवकरी) : जुन्नर शहरात सकाळी १० : ३० वा. गजबजलेल्या सदारबाजारपेठ येथे इरफान हलवाई यांच्या बांगड्याच्या दुकानासमोर सहा जणांनी कोयता , लोखंडी रॉड , अँगल घेऊन सार्वजनिक ठिकाणी दहशत माजविणे कारस्थान केले . यावेळी पोलीस स्टेशन ने एक आरोपी पकडला व पाच आरोपी फरार झाले आहे .याबाबत सविस्तर हाकिगत हकीगत अशी , कैलास माधव केंद्रे पोलीस शिपाई यांना माहिती मिळाली कि , अरबाज मजीद हलवाई , मुजम्मील इरफान हलवाई हे भरदिवसा रस्त्यावर हातामध्ये कोयता घेवुन नागरिकांच्या अंगावर धावुन जात आहेत. इरफान मजीद हलवाई हा लोखंडी रॉड असलेला चैनव्हील हातात घेवुन सार्वजनिक ठिकाणी हत्यारांच्या माध्यमातुन दहशत माजवत आहे. शायरा मजीद हलवाई, मुस्कान अरबाज हलवाई, मोहसीन इकबाल अत्तार हे सर्व राहणार सदाबाजारपेठ यांनी हातामध्ये लोखंडी अँगल घेवुन सर्वांनी सार्वजनिक ठिकाणी गैर कायद्याची मंडळी जमवुन मोठमोठ्याने आरडाओरड, शिवीगाळ केली. सदर आरोपी इसमांविरूध्द सरकार तर्फे रजिस्टर नंबर - १७० / २०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम - १८९ ( २), १८९ ( ४ ), १९१ (२ ), १९० ,३५२ , ३५१ ( २ ), ४ २५ प्रमाणे तसेच बि एन एस एस १२६ BNSS १२६ प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे . आरोपी नंबर २ विधी संघर्ष बालक मुजम्मिल इरफान हलवाई याच्यावर गु.र.नंबर ३९३ / २०२४ पॉक्सो प्रमाणे गुन्हा दाखला आहे. आरोपी नंबर ६ मोसिन इकबाल अत्तार यांच्यावर गु.र.नंबर १२५ / २६ बी एन एस ३०५ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल २७९ / २०२१, २२५ / २०१८ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे . या घटनेचा तपास पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पो हवा हिले पुढील तपास करीत आहे.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण प्रक्रियेला स्थगिती द्या

मुंबई : (स. गांवकरी)



अनुसूचित जातींच्या (SC) आरक्षणात प्रस्तावित असलेल्या उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेला राष्ट्रीय जातीय जनगणना पूर्ण होईपर्यंत तातडीने स्थगिती देण्यात यावी, या मागणीसाठी 'महाराष्ट्र अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण पुनर्विलोकन समिती'तर्फे राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्री संजय शिरसाट यांना निवेदन सादर करण्यात आले. या मागण्या मान्य न झाल्यास समितीच्या वतीने येत्या ३० जून रोजी मुंबईत 'विधानभवन घेराव आंदोलन' करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मंत्री शिरसाट यांची भेट घेऊन या विषयातील कायदेशीर व तांत्रिक त्रुटींवर सविस्तर चर्चा केली. या प्रसंगी प्रवीण सरोदे, सुधाकर अभंग, सुरेश शिंदे, भाऊसाहेब साबळे आणि रुपेश वाघचौरे प्रामुख्याने उपस्थित होते. या विषयावर आलेल्या ७५ हजारांपेक्षा अधिक हरकती पुढील कारवाईसाठी 'बार्टी'कडून (BARTI) राज्य शासनाकडे पाठविण्यात आल्या असून, राज्याचे मुख्य सचिव त्यावर पुढील कायदेशीर कारवाई करतील, अशी माहिती सामाजिक न्याय विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावेळी दिली. निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उपवर्गीकरणासाठी 'मोजता येण्याजोग्या सांख्यिकी माहितीची' (Quantifiable Data) कायदेशीर अट आहे. केंद्र सरकारची अधिकृत आकडेवारी समोर येत नाही, तोपर्यंत केवळ अनुमानाच्या आधारे उपवर्गीकरण करणे असंवैधानिक ठरेल.

# पश्चिम पट्ट्यात वादळी वाऱ्यासह गारपिटीचा कहर

## दीड तासाच्या पावसाने फळभाज्यांचे नुकसान, घरांची पत्रे उडाली

कनाशी : (स. गांवकरी)



कळवण सह तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात काल सायंकाळी अचानक आलेल्या वादळी वाऱ्यासह गारपिटीने आणि पावसाने कहर केला. अवघ्या एक ते दीड तास चाललेल्या या अवकाळी पावसामुळे फळभाज्या व पालेभाज्यांचे मोठे नुकसान झाले. शेतकऱ्यांची एकच तारांबळ उडाली. गंगापूर, कनाशी, भारडामोक,गोळाखाल, चनकापूर , करंभेळ, मोहमुख, सह परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. काही ठिकाणी गाराही पडल्या. वादळी वाऱ्यामुळे कोथिंबिरीचे पीक आडवे झाले. टोमॅटो, मिरची, वांगी, कारली या फळभाज्या झाडावरून गळून पडल्या. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली. वादळ इतके प्रचंड होते की अनेक घरांवरील पत्रे उडून गेले. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला. जनावरे गोठ्यातून बाहेर काढताना शेतकऱ्यांची धावपळ उडाली. गेल्या दोन महिन्यांपासून उष्णतेच्या कडाक्याने व उकाड्याने नागरिक हैराण झाले होते. कालच्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला व नागरिकांना मोकळा श्वास मिळाला. मात्र ऐन हंगामात आलेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. "कांद्याला भाव नाही, द्राक्ष बागा अडचणीत, त्यात आता भाजीपाल्याचे नुकसान. शेतकऱ्याने जगायचे कसे?" असा सवाल गंगापूर येथील शेतकरी शांताराम देशमुख यांनी उपस्थित केला. झालेल्या

या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. कृषी विभाग व महसूल विभागाच्या पथकांनी तात्काळ पाहणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

हवामान खात्याने पुढील दोन दिवस वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा दिल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

> गंगापूर येथील शेतकरी निवृत्ती बागुल म्हणाले, "एक एकर कोथिंबीर काढणीला आली होती. वादळाने सगळी जमीनदोस्त झाली. खर्च अवाच्या सव्वा झाला त्यातच आज उद्या मार्केटला उपटून द्यायची होती मात्र काल झालेल्या या वादळी वाऱ्याच्या पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला."
> **- निवृत्ती बागुल**
> **शेतकरी गंगापूर कनाशी**

# मोदींचा अलीकडील विदेश दौरा

## भारताच्या दीर्घकालीन जागतिक स्थाननिर्मितीचा एक मास्टर स्ट्रोक

(स. गांवकरी)

जागतिक राजकारणात अनेकदा मोठ्या घोषणा, आक्रमक वक्तव्ये आणि सतत चर्चेत राहणाऱ्या घटनांना जास्त महत्त्व दिले जाते. माध्यमांच्या युगात एखादा देश किती चर्चेत आहे, यावरूनच त्याची ताकद मोजली जाते असा एक सर्वसाधारण समज निर्माण झाला आहे. परंतु इतिहास सांगतो की जगातील सर्वात प्रभावी बदल अनेकदा शांतपणे घडतात. त्यांची सुरुवात कॅमेऱ्यांसमोर नसते, ती बोर्डरूममध्ये, करारांच्या कागदांवर, आर्थिक भागीदारीत आणि दीर्घकालीन धोरणांमध्ये होते.

अशाच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील विदेश दौऱ्याकडे पाहिले तर तो केवळ काही देशांना दिलेल्या भेटींचा कार्यक्रम नव्हता, तर भारताने गेल्या दशकभरात तयार केलेल्या जागतिक स्थाननिर्मितीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून त्याचा विचार करता येईल. त्या काळात जागतिक माध्यमांचे लक्ष अनेक इतर घटनांकडे होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या चीनसंदर्भातील हालचाली, जागतिक राजकारणातील विविध घडामोडी, सोशल मीडियावरील चर्चांचे विषय, कॉक्रोच जनता पार्टी सारखे विषय आणि प्रादेशिक संघर्ष यामुळे हा दौरा तितका चर्चेत आला नाही. परंतु धोरणात्मक दृष्टिकोनातून पाहिल्यास या दौऱ्यातील प्रत्येक थांबा भारताच्या भविष्यातील आर्थिक, तांत्रिक, ऊर्जा आणि भूराजकीय हितसंबंधांशी जोडलेला दिसतो. हा दौरा भारताला केवळ एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून नव्हे, तर जागतिक व्यवस्थेतील एक अपरिहार्य भागीदार म्हणून उभे करण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून पाहिला जाऊ शकतो. भारताच्या परराष्ट्रनीतीतील बदल 'अलिप्तता चळवळ पासून 'बहुपक्षीय सहभागा'पर्यंत झाला आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने दीर्घकाळ गुटनिरपेक्ष धोरण स्वीकारले. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघ या दोन महासत्तांमध्ये भारताने स्वतंत्र भूमिका राखण्याचा प्रयत्न केला. परंतु एकविसाव्या शतकात परिस्थिती बदलली. आज जग बहुध्रुवीय बनत आहे. अमेरिका, चीन, युरोपियन युनियन, रशिया, आखाती देश आणि इंडो-पॅसिफिक प्रदेशातील शक्ती यांच्यातील स्पर्धा वाढत आहे. अशा परिस्थितीत भारताने एकाच गटात न राहता सर्वांसोबत सहकार्य राखण्याची नीती स्वीकारली आहे. याच धोरणाचा प्रभाव या दौऱ्यात दिसून येतो. एका बाजूला आखाती देशांशी ऊर्जा आणि गुंतवणुकीचे संबंध मजबूत करणे, दुसऱ्या बाजूला युरोपसोबत तंत्रज्ञान आणि व्यापार भागीदारी वाढवणे, तसेच सेमीकंडक्टर आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या भविष्यातील क्षेत्रांमध्ये स्थान निर्माण करणे हा या दौऱ्याचा व्यापक संदेश मानला जाऊ शकतो.

दौऱ्याची सुरुवात संयुक्त अरब अमिरातीमधील अबुधाबी येथून झाली. ऊर्जा ही कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगतीची जीवनवाहिनी असते. भारत जगातील सर्वात मोठ्या ऊर्जा आयातदारांपैकी एक आहे. त्यामुळे तेल आणि गॅस पुरवठ्याची सुरक्षितता हा राष्ट्रीय सुरक्षेचाच भाग मानला जातो. गेल्या काही वर्षांत भारताने आखाती देशांशी संबंध केवळ तेल खरेदीपुरते मर्यादित ठेवले नाहीत. गुंतवणूक, पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स, संरक्षण आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्येही सहकार्य वाढवले आहे.

पहिला म्हणजे ऊर्जा सुरक्षेची मजबुती. जागतिक संघर्ष किंवा पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे तेलाच्या किंमतीत अचानक वाढ झाली तरी भारताला त्याचा धक्का कमी बसावा यासाठी धोरणात्मक साठे आणि दीर्घकालीन भागीदारी महत्त्वाची ठरते.दुसरा मुद्दा म्हणजे गुंतवणूक. UAE आणि इतर आखाती देशांकडे प्रचंड आर्थिक संसाधने आहेत. हे भांडवल भारतातील महामार्ग, बंदरे, विमानतळ, औद्योगिक कॉरिडॉर आणि शहरी विकास प्रकल्पांमध्ये गुंतले तर त्याचा दीर्घकालीन फायदा भारतीय अर्थव्यवस्थेला होऊ शकतो.

तिसरा मुद्दा म्हणजे भूराजकीय स्थान. मध्यपूर्वेतील कोणत्याही अस्थिर परिस्थितीत भारत विश्वासार्ह भागीदार आणि संपर्क केंद्र म्हणून उभा राहू शकतो. सेमीकंडक्टर युग आणि ASML चे महत्त्व आजच्या जगात तेल जितके महत्त्वाचे आहे, तितकेच महत्त्व सेमीकंडक्टरचे झाले आहे. मोबाइल फोनपासून ते उपग्रहांपर्यंत, कृत्रिम बुद्धिमत्तेपासून ते आधुनिक संरक्षण प्रणालीपर्यंत प्रत्येक क्षेत्राचा पाया चिप्सवर उभा आहे. या पार्श्वभूमीवर नेदरलँड्समधील ASML कंपनीचे नाव विशेष महत्त्वाचे ठरते. ASML ही जगातील अत्याधुनिक चिप उत्पादनासाठी लागणारी उपकरणे तयार करणारी अग्रगण्य कंपनी आहे. तिच्या तंत्रज्ञानाशिवाय आधुनिक सेमीकंडक्टर उद्योगाची कल्पनाही करता येत नाही. भारताने जर या क्षेत्रात दीर्घकालीन भूमिका निर्माण करायची असेल, तर अशा कंपन्यांसोबत सहकार्य करणे अत्यावश्यक ठरते. गेल्या काही दशकांत भारत माहिती तंत्रज्ञान सेवांमध्ये जागतिक स्तरावर यशस्वी झाला. परंतु हार्डवेअर उत्पादनात भारताची उपस्थिती तुलनेने मर्यादित राहिली. आता परिस्थिती बदलत आहे. भारत स्वतःची सेमीकंडक्टर परिसंस्था उभारण्याचा प्रयत्न करत आहे. उत्पादन, संशोधन, डिझाईन, कौशल्य विकास आणि जागतिक पुरवठा साखळीतील सहभाग या सर्व क्षेत्रांमध्ये भारताने पावले उचलली आहेत. जर भारत या क्षेत्रात यशस्वी झाला तर त्याचे परिणाम दूरगामी असतील. यामुळे रोजगारनिर्मिती होईल, उच्च मूल्यवर्धित उद्योग विकसित होतील आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही भारत अधिक सक्षम बनेल. आज कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच AI हे केवळ एक तांत्रिक क्षेत्र नाही. ती संपूर्ण अर्थव्यवस्था बदलण्याची क्षमता असलेली क्रांती आहे. स्वीडनसारख्या देशांकडे संशोधन, नवोपक्रम आणि प्रगत उद्योग क्षेत्रात मोठा अनुभव आहे. भारताकडे मोठी प्रतिभा, विशाल बाजारपेठ आणि वेगाने वाढणारी डिजिटल अर्थव्यवस्था आहे. या दोन शक्ती एकत्र आल्यास त्यातून जागतिक पातळीवरील मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात. भारतीय स्टार्टअप्सना युरोपियन बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळणे, संशोधन सहकार्य वाढणे आणि नवीन तंत्रज्ञान विकासाला चालना मिळणे हे त्याचे संभाव्य परिणाम आहेत. काही वर्षांपूर्वी भारत आणि युरोपियन युनियन यांचे संबंध मुख्यतः व्यापार आणि राजनैतिक संवादापुरते मर्यादित होते. आज ते तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, हरित ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, संरक्षण आणि पुरवठा साखळी या क्षेत्रांपर्यंत विस्तारले आहेत. हे परिवर्तन महत्त्वाचे आहे. कारण भविष्यातील जागतिक स्पर्धा केवळ उत्पादन किंवा व्यापारावर आधारित नसणार आहे. ती ज्ञान, नवोपक्रम आणि तंत्रज्ञानावर आधारित असेल.

ओस्लो भेटीचे महत्त्व वेगळ्या कारणासाठी आहे. नॉर्वे हा लोकसंख्येने लहान असला तरी आर्थिकदृष्ट्या अत्यंत प्रभावशाली देश आहे. त्याचा सार्वभौम संपत्ती निधी जगातील सर्वात मोठ्या निधींपैकी एक मानला जातो. अशा देशांसोबतची भागीदारी भारतासाठी महत्त्वाची ठरते. हरित ऊर्जा, सागरी तंत्रज्ञान, जलवाहतूक, हायड्रोजन अर्थव्यवस्था आणि हवामानस्नेही विकास या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढण्याची शक्यता आहे.

आज जगातील दोन सर्वात प्रभावशाली शक्ती म्हणजे अमेरिका आणि चीन. दोघांमध्ये तंत्रज्ञान, व्यापार, संरक्षण आणि जागतिक प्रभावासाठी तीव्र स्पर्धा सुरू आहे. या परिस्थितीत भारताची भूमिका वेगळी आहे. भारत अमेरिकेशीही सहकार्य करतो. रशियाशीही संबंध राखतो. आखाती देशांशीही जवळीक वाढवतो. युरोपसोबतही भागीदारी करतो. ही भूमिका भारताला स्वतंत्र धोरणात्मक जागा देते. त्या काळात जागतिक माध्यमांमध्ये अमेरिकन राजकारण आणि चीनविषयीच्या चर्चांना मोठे स्थान मिळत होते. परंतु अनेकदा माध्यमांचे लक्ष आणि धोरणात्मक महत्त्व या दोन वेगळ्या गोष्टी असतात. माध्यमांमध्ये एखादी घटना चर्चेत असू शकते; परंतु दीर्घकालीन परिणाम दुसऱ्याच प्रक्रियेमुळे घडत असतात. भारताने या काळात आपले लक्ष चर्चांपेक्षा भागीदारींवर केंद्रित ठेवले. ऊर्जा, गुंतवणूक, तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर, AI, हरित अर्थव्यवस्था आणि व्यापारी मार्ग यांसारख्या क्षेत्रांमध्ये स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न केला.

### हरित विकासाचा भारतीय मार्ग

भारताच्या विकासाची गरज प्रचंड आहे. त्याचवेळी पर्यावरणीय जबाबदारीही महत्त्वाची आहे. म्हणूनच भारताला असा विकास मॉडेल आवश्यक आहे जो औद्योगिकीकरण आणि पर्यावरणीय संतुलन यांच्यात समतोल राखू शकेल. नॉर्वेसारख्या देशांसोबतचे सहकार्य या दिशेने उपयुक्त ठरू शकते.

### मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या परराष्ट्र धोरणाचा परिणाम

- हा दौरा अचानक घडलेली घटना नव्हती.
- गेल्या दशकभरात भारताने आखाती देशांशी संबंध सुधारले. युरोपसोबत संवाद वाढवला.
- अमेरिकेसोबत धोरणात्मक सहकार्य मजबूत केले.
- क्वाडसारख्या मंचांमध्ये सहभाग वाढवला.
- जागतिक दक्षिणेचा आवाज म्हणून भूमिका घेतली.



### नव्या व्यापारी मार्गांची संकल्पना

जागतिक इतिहासात व्यापारी मार्गांनी अनेक साम्राज्यांचे भविष्य घडवले आहे. सिल्क रूटपासून सुएझ कालव्यापर्यंत प्रत्येक मार्गाने जगाचे आर्थिक नकाशे बदलले. आज IMEC (India-Middle East-Europe Corridor) ही संकल्पना त्याच परंपरेतील एक आधुनिक प्रयोग म्हणून पाहिली जाते. या प्रकल्पाचा उद्देश भारत, मध्यपूर्व आणि युरोप यांना अधिक कार्यक्षम मार्गांनी जोडणे हा आहे. जर हा प्रकल्प यशस्वी झाला, तर भारत जागतिक व्यापारातील एक महत्त्वाचा दुवा बनू शकतो.